# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी आरोग्य विभागाच्या कामकाजाच्या चौकशीसाठी तीन सदस्यीय समिती नेमल्याबाबत

**(१) ३५३ (०१-०५-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य सेवांमध्ये सुधारणा न केल्यामुळे दर्जा कमी होत असल्याने अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक यांनी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे यांच्यावर कारवाई करुन आरोग्य विभागाच्या संपूर्ण कामकाजाच्या चौकशीचे आदेश जारी केल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित चौकशीसाठी तीन सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली असून सात दिवसांत समितीला चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू समितीने अहवाल सादर केला आहे काय, समितीच्या अहवालाच्या शिफारशी काय आहेत, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

आरोग्य वैद्यकीय विभागाबाबत सातत्याने नागरिकांच्या तक्रारीच्या कारणास्तव दिनांक १६.०१.२०२५ अन्वये आरोग्य वैद्यकीय विभागातील कामकाजाची तपासणी करणेबाबतचे आदेश देण्यात आले. यामध्ये वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले आहे. त्यांची वैयक्तिक चौकशी नसून विभागाची तपासणी करण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

समितीच्या अहवालातील शिफारशी -

i) पंधराव्या वित्त आयोगाच्या शासकिय निधीच्या स्टेट बँक ऑफ इंडिया जीपीओ चौक अहिल्यानगर या खात्यामधून क्र.४०९३९१३४८०४ दिनांक ९/२/२३ रोजी रु.१६ लाख ५० हजार इतकी रक्कम PFMS प्रणालीचा वापर करून आनलाईन प्रक्रियेद्वारे शहर लेखा व्यवस्थापक यांचे वैयक्तिक खाते क्र.६४१६१०१००३८०५ मध्ये जमा झाल्याचे तपासणी मध्ये आढळून आले.

सदरचा आर्थिक व्यवहार माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये घडलेला असूनही शहर लेखा व्यवस्थापक यांचेवर योग्य आर्थिक नियंत्रणासाठी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी कोणतीही उपाय योजना केली नाही.

ii) स्टेट बँक ऑफ इंडिया जीपीओ चौक अहिल्यानगर या खात्यामधून क्र.४०९३९१३४८०४ दिनांक ७.२.२३ रोजी रु.१५ लाख रक्कम PFMS प्रणालीचा वापर करून ऑनलाईन प्रक्रीयेद्वार शहर लेखा व्यवस्थापक यांच्या

वैयक्तिक खाते क्र. ६४१६१०१००३८०५ वर जमा झाल्याचे तपासणी मध्ये आढळून आले. शहर लेखा व्यवस्थापक यांनी स्वतःच्या बँक खात्यातून दिनांक ९.२.२३ रोजी रु.५ लाख, रु.५ लाख व दिनांक १०.२.२३ रोजी रु.५ लाख असे एकुण १५ लाख रुपये १५ वा वित्त आयोगाच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यामध्ये ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पुन्हा जमा केले.

iii) १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधी सक्षम प्राधिका-याची मंजुरी न घेता अदा करण्यात आलेल्या देयकाबाबत.

iv) देयकातुन शासकीय कपाती व इपीएफ मधुन कपात केलेल्या रकमा भरणा केलेल्या नसलेबाबत.

v) विविध योजनांचे लेखे व कॅशबुक मधील आढळून आलेल्या त्रुटी.

vi) पीसीपीएनडीटी / बॉम्बे नर्सिंग ॲक्ट अंतर्गत परवाने देण्यामध्ये त्रुटी.

vii) सेवा हमी कायद्यानुसार देण्यात येणा-या सेवा मधील अनियमितता.

viii) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) कार्यालयोन कामकाजाचे नियोजन व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेवर नियंत्रण नसलेबाबत.

ix) एनयुएचएम व विविध कार्यक्रमांच्या अंतर्गत कंत्राटी स्वरुपाची रिक्त पदे भरतीमधील अनियमितता.

x) वैद्यकिय आरोग्य अधिकारी (MOH) रँकिंगमधील क्रमवारीत सातत्याने शेवटच्या स्थानाजवळ असलेबाबत.

xi) औषध खरेदी व औषध साठा नोंदवही तपासणी दरम्यान संबंधित कर्मचारी यांनी कोणताही चार्ज न देता विनामंजुरी दिर्घ रजेवर गेल्याबाबत.

xii) जैवविविध कचरा प्रकल्पातुन मिळणा-या रॉयल्टी मधील अनियमिततेबाबत.

याप्रमाणे समितीने २७ मुद्दे काढून गंभीर आक्षेप नोंदविलेले आहेत.

तसेच सदरची बाब ही आर्थिक अपहाराबाबत असल्याने वैद्यकीय आरोग्य अधिकारी व शहर लेखा व्यवस्थापक यांचे विरुद्ध फौजदारी गुन्हा रजि.नं. ८८/२०२५ भा.द. वि. कलम ४०९, ४२०, ३४ प्रमाणे कोतवाली पोलिस स्टेशन आहिल्यानगर येथे दाखल करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक यांच्या दिनांक १४.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये १५ वा वित्त आयोग व एनयुएचएम व इतर निधीतील अनियमितता व अपहाराची सखोल चौकशी करुन वस्तुनिष्ठ अहवाल आठ दिवसांच्या आत सादर करण्याचे आदेश महानगरपालिका स्तरावरुन देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विशेष पोलीस महानिरिक्षक कोल्हापूर परिक्षेत्राचे मुख्य कार्यालय पुणे शहरात स्थलांतरीत होत असल्यबाबत

**(२) ११३० (२६-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरसह सांगली, सातारा, सोलापूर व पुणे ग्रामीण यांचे मुख्यालय असलेले विशेष पोलीस महानिरिक्षक कोल्हापूर परिक्षेत्राचे मुख्य कार्यालय पुणे शहरात स्थलांतरीत करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष पोलीस महानिरिक्षक कोल्हापूर परिक्षेत्राचे मुख्य कार्यालय पुणे शहरात स्थलांतरीत करणार असल्याने या विरोधात कोल्हापूर शहरात जनआंदोलन उभे राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूरची लोकसंख्या, व्यापारीदृष्ट्या असलेले महत्व, कर्नाटक-गोवा राज्यांच्या सीमा, वाढणारी गुन्ह्यांची संख्या पाहता हे कार्यालय कोल्हापूर येथे असणे गरजेचे असल्याची मागणी होत असून विशेष पोलीस महानिरिक्षक कोल्हापूर परिक्षेत्राचे मुख्य कार्यालय कोल्हापूर शहरात राहण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विशेष पोलीस महानिरिक्षक कोल्हापूर परिक्षेत्राचे मुख्य कार्यालय पुण्यात स्थलांतरीत करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व त्यानुषंगाने सदर कार्यालयात स्थलांतरीत न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२६) :** (१) सद्यस्थितीमध्ये विशेष पोलीस महानिरिक्षक कोल्हापूर परिक्षेत्राचे मुख्य कार्यालय पुणे शहरात स्थलांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर प्राप्त नाही.
(२) सदर जनआंदोलनाबाबत पोलीस अधीक्षक, कोल्हापूर, पोलीस अधीक्षक, सांगली, पोलीस अधीक्षक, सातारा व पोलीस अधीक्षक, सोलापूर यांचे कार्यालयाकडे निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि, सदर कार्यालय पुणे येथे स्थलांतर करण्यास विरोध असणाऱ्या बातम्या वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द झाल्या आहेत.
(३) हो, हे खरे आहे.

श्री. शाहू छत्रपती, सन्मा. लोकसभा सदस्य श्री. अमल महाडिक, मा.वि.स.स., श्री. सुधीरदादा उर्फ धनंजय हरी गाडगीळ मा.वि.स.स., श्री.प्रविणभाई माणगावे, सरचिटणीस, जनता दल (सेक्युलर), श्री. अनिल सुतार, जिल्हा उपाध्यक्ष, भा.ज.पा. कोल्हापूर व श्री. रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी लोकसभा सदस्य यांनी कोल्हापूर येथील विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय पुणे येथे स्थलांतरीत न करता कोल्हापूर येथेच ठेवण्याबाबतची निवेदने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिलेली आहेत.
(४) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कार्यालयाच्या दिनांक २२.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांचे मुख्यालय पुणे येथे स्थलांतरीत करणेबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अहवाल सादर करण्यात आलेला आहे. सध्या पोलीस महासंचालक कार्यालय स्तरावर सदर प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंदखेडराजा (जि. बुलढाणा) येथे राजमाता जिजाऊ माँ साहेब जन्मस्थळाकरिता विकास आराखडा मंजूर करण्याबाबत

**(३) १६६२ (२३-०४-२०२५). श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेडराजा (जि. बुलढाणा) येथे दरवर्षी दिनांक १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ माँ साहेब जन्मोत्सवाच्या दिवशी महाराष्ट्रासह इतर राज्यातून लाखो जिजाऊ भक्त येत असून हे जन्मस्थळ विकासापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) आल्यास, भक्तांची गैरसोय टाळण्यासठी व त्यांना सुविधा उपलब्ध करुन जन्म स्थळाचा विकास करण्यासाठी आराखडयामध्ये ५०० कोंटीचा निधी वाढवून देण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१६-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सिंदखेडराजा, जि. बुलढाणा येथील राजामाता जिजाऊ माँ साहेब यांचे जन्मस्थळ हे राज्य संरक्षित स्मारक आहे.

जिल्हाधिकारी, बुलढाणा रोजीच्या आदेशान्वये सन २०२३-२४ या वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत रु. ९.०१ इतक्या रकमेच्या कामास (१. राजवाडा २. मोती तलाव व ३. सावकार वाडा) प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर काम पूर्ण झाले आहे.

जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी दिनांक २४.०९.२०२४ रोजीच्या आदेशान्वये सन २०२४-२५ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत रु. १.०३ कोटी इतक्या रकमेच्या कामास (लखुजीराव जाधव राजवाडा) प्रशासकीय मान्यता दिली आहे.

जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी सिंदखेडराजा विकास आराखड्याच्या दुसऱ्या टप्प्यासाठी रु. १२५.७८ कोटी इतक्या रकमेचा सविस्तर आराखडा तयार करुन संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांना तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांनी दिनांक १२.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये तत्वत: तांत्रिक मान्यता दिलेली आहे. सदर आराखडा जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी नियोजन विभागास मान्यतेस्तव सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक शहरात पाईपलाईनने गॅस पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र नॅचरल गॅस कंपनीकडून करण्यात येत असलेले काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४) १७१४ (०१-०५-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील प्रत्येक घराघरात थेट पाईपलाईनने गॅस पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र नॅचरल गॅस कंपनीकडून दोन वर्षापासून सुरु असलेले काम अद्यापही पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गॅस पाईपलाईनसाठी ४० किलो मिटरचे रस्ते खोदण्याचे काम माहे जानेवारी, २०२५ मध्ये कपंनी पुन्हा सुरु करणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील खोदलेले रस्ते पुन्हा पूर्ववत करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०२-२०२६) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २३९ नुसार विविध सेवा पुरविणे करीता भुमिगत वाहिन्या टाकणेसाठी महानगरपालिकेमार्फत रस्ता खोदण्यास परवानगी देण्यात येते. विविध संस्था / कंपन्यांना त्यांच्या विविध सेवा वाहिन्या टाकणेकरीता रस्ता फोडण्याची परवानगी देतांना शासन परिपत्रका नुसार नाशिक महानगरपालिकेने निश्चित केलेले रोड डॅमेज चार्जेस आकारण्यात येतात.

नाशिक शहरात भुमिगत गॅस पाईप लाईन टाकण्याकरीता महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी ज्या भागात पाईप लाईन टाकण्याची मागणी केली आहे. त्याच भागात रस्ता खोदण्याची परवानगी दिली जाते. संबंधित कंपनीकडून रोड डॅमेज फी वसुल करण्यात आल्याने खोदलेले रस्त्यातील टेंचेस नाशिक महानगरपालिकेमार्फत उपलब्ध निधीनुसार टप्या-टप्याने ट्रेचेसची दुरुस्ती हाती घेण्यात येते.

---

## नाशिक महानगरपालिका अंतर्गत ग्रीन जिमची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत

**(५) १८९५ (०१-०५-२०२५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरिकांना आरोग्य विषयक सुविधा पुरविण्याची नाशिक महानगरपालिकेची जबाबदारी असताना नाशिक महानगरपालीकेकडून ग्रीन जिमची देखभाल दुरुस्ती होत नसल्याने शासनाने खर्च केलेले करोडो रुपये वाया जात असल्याची बाब दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रीन जीमची देखभाल दुरुस्ती न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, नशिक महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्या जाणाऱ्या ग्रीनजिम बाबत शासन निश्चित धोरण ठरवणार आहे काय असल्यास कधी पर्यंत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०२-२०२६) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाशिक महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक ठिकाणे जसे की उद्याने, जॉगींग ट्रॅक, मैदाने, खुल्या जागा इ. ठिकाणी ग्रीनजिम साहित्य बसविण्यात आले आहे. त्यामध्ये आवश्यक स्वरुपाच्या दुरुस्त्या महानगरपालिकेमार्फत उपलब्ध तरतुदीनुसार वेळोवेळी करण्यात येतात. तसेच उद्यानात बसविणेत आलेल्या ग्रीनजिम परिसराची स्वच्छता व देखभाल उद्यान विभागामार्फत केली जाते.

(३) नाशिक महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका व्यतिरिक्त सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शहरात विविध ठिकाणी ग्रीनजिम साहित्य बसविणेकरीता नाशिक महानगरपालिकेमार्फत विविध अटीशर्तीस अधिन राहून व देखभाल दुरुस्तीची जबाबादारी कार्यान्वयीन यंत्रणेची असल्याबाबत नमुद करून नाहरकत दाखला देण्यात येतो. तथापी सदरचे बसविण्यात आलेले ग्रीनजिम साहित्याची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. परंतु महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचेमार्फत विविध ठिकाणी बसविण्यात आलेले ग्रीनजिम साहित्याचा दोषदायित्व कालावधी संपल्यानंतर सदर ग्रीनजिम साहित्यांची गुणवत्ता, सद्यस्थिती, संयुक्त पाहणी व विहीत कार्यपध्दतीने हस्तांतरीत केल्यानंतर महानगरपालिकेमार्फत सदर साहित्यांची देखभाल दुरुस्ती करण्यात येईल.

---

## सोलापूरमधील महानगरपालिकेचे महात्मा गांधी प्राणीसंग्रहालय बंद असल्याबाबत

**(६) २८३० (०१-०५-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर विजापूर रस्ता परिसरातील महापालिकेचे महात्मा गांधी प्राणीसंग्रहालय गेल्या पाच वर्षापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाने उक्त प्राणी संग्रहालयाचा परवाना रद्द केला असून तो पुन्हा देण्यासाठी पथकाने केलेल्या पाहणीत ४५ त्रुटी आढळून आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्राणी संग्रहालयातील १६५ प्राण्यांवर कोट्यवधी रुपयाचा खर्च करून ही सोलापूरकरांना हे प्राणी संग्रहालय पाहता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण समितीने काढलेल्या ४५ त्रुटीची पूर्तता तात्काळ करून सदर प्राणी संग्रहालय जनतेसाठी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०२-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) केंद्रीय प्राणीसंग्रहालय यांनी काढलेल्या ४५ त्रुटींपैकी ११ त्रुटींची पुर्तता सोलापूर महानगरपालिकेकडून करण्यात आली आहे. उर्वरित त्रुटींची पूर्तता करण्याबाबत सोलापूर महानगरपालिकेडून कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात अस्तित्वात असलेली सर्व प्राचीन हेमांडपंती शैलीतील मंदिरे महाराष्ट्र प्राचीन स्मारके आणि पुरातत्त्व स्थळे आणि अवशेष अधिनियम १९६० अंतर्गत संरक्षित करण्याबाबत**

**(७) ५२६६ (०८-०४-२०२५). श्री.प्राविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अस्तित्वात असलेली सर्व प्राचीन हेमांडपंथी शैलीतील मंदिरे महाराष्ट्र प्राचीन स्मारके आणि पुरातत्त्व स्थळे आणि अवशेष अधिनियम १९६० अंतर्गत संरक्षित करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या व ऐतिहासिक वारसा जोपासणाऱ्या हेमांडपंथी मंदिरांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी संबंधित विभागाने कोणत्या योजना आखल्या आहेत व त्याकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१६-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून महाराष्ट्र प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष अधिनियम १९६० अंतर्गत् राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करणाऱ्याकरीता असणाऱ्या निकषांची पूर्तता करणाऱ्या स्मारकांना राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले जाते. यानुषंगाने सद्यस्थितीत एकूण ३९० स्मारके राज्य संरक्षित स्मारके घोषित करण्यात आली आहेत. त्यामीधल एकुण १४९ प्राचीन मंदिरे आहेत. तसेच १९६० च्या अधिनियमान्वये राज्य संरक्षित स्मारके म्हणून घोषित करावयाच्या निकषात बसणाऱ्या स्मारकांचे संरक्षण प्रस्ताव शासनास वेळोवेळी प्राप्त होतात.
(२) वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या व ऐतिहासिक वारसा जोपासणाऱ्या हेमांडपंथी मंदिराचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयातर्फे विविध योजना व त्याअंतर्गत निधीची तरतूद वेळोवेळी करण्यात येते. सद्यस्थितीमध्ये ७० मंदिरांचे जतन आणि संवर्धन करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) राज्य संरक्षित स्मारकांच्या यादीमध्ये ज्या मंदिरांचा समावेश नाही अशा मंदिरांची पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाच्या अधिनस्त पुरातत्व विभागीय कार्यालयांमार्फत वेळोवेळी पाहणी करुन राज्य संरक्षित घोषित करण्याच्या पात्रतेत बसत असल्यास त्यांच्या संरक्षणाची कार्यवाही निरंतर सुरु असते.
(४) राज्य संरक्षित स्मारक घोषित करणे ही महाराष्ट्र प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष अधिनियम १९६० अंतर्गत चालणारी निरंतर प्रक्रिया असल्याने सदर प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजुरा (जि.चंद्रपूर) येथील पुरातन सिध्देश्वर मंदीर, सोमेश्वर मंदिर, विष्णू मंदिर व माणीकगड किल्ला जतन व दुरूस्ती कामाकरीता निधी मंजूर करून पर्यटकांना सुविधा उपलब्ध करून देणेबाबत

**(८) ८०३५ (०७-१०-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) येथील पुरातन सिध्देश्वर मंदीर, सोमेश्वर मंदिर, विष्णू मंदिर व माणीकगड किल्ला जतन व दुरूस्ती कामाकरीता निधी मंजूर करून पर्यटकांना सुविधा उपलब्ध करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी मा.पर्यटन मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१६-०२-२०२६) :** (१), (२), (३) हे खरे नाही.

पुरातत्व व वस्तुसंग्रहालयाच्या संचालनालयाअंतर्गत असलेल्या कार्यक्षेत्रातील सोमेश्वर मंदिर, राजुरा, जि. चंद्रपूर व विष्णू मंदिर, माणिकगड मंदिर, ता. जिवती, जि. चंद्रपूर या राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन दुरूस्तीचे कामे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव एकछत्र योजना अंतर्गत करण्यात आली असून ही कामे माहे मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात आली आहेत.

तसेच जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून सिध्देश्वर मंदिर ता. राजुरा, जि. चंद्रपूर या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन दुरूस्ती कामाकरिता प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून काम प्रगतीपथावर आहे.

---

## मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी येथील दोन्ही बोगदांना गळती लागल्याबाबत

**(९) ८२२३ (१८-०८-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी येथील दोन्ही बोगदांना गळती लागल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गावरील दोन्ही मार्गिका वाहतूकीसाठी सुरु केल्या असल्या तरी उन्हाळ्यात बोगदयात पाणी पाझरत असून गळती थांबविण्यासाठी दुरुस्तीवर कोट्यवधी रुपये खर्च करुनही सततच्या गळतीमुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली तसेच संबंधित दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (११-०९-२०२५) :** (१) अशंत: खरे आहे,

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या कशेडी बोगदयाचे काम राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) विभागामार्फत प्रगतीत आहे. या बोगद्याच्या प्रकल्पाचे सुमारे ९८% काम पूर्ण झाले असून बोगद्याच्या पूर्ण झालेल्या भागातून सध्या वाहतूक सुरळीत सुरू आहे. कशेडी बोगद्यात काही ठिकाणी गळती असून गळती सहसा खडकाच्या स्वरूपामुळे आणि त्या ठिकाणच्या भूगर्भीय परिस्थितीमुळे होत आहे.

(२) हे खरे नाही,

कशेडी बोगदयाचे काम EPC तत्वावर प्रगतीत आहे. सदर कंपनीशी EPC नुसार झालेल्या करारनाम्यानुसार कामाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च ठेकेदाराच्या स्वखर्चातून करण्यात येतो. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर चार वर्षांपर्यंत देखभाल दुरुस्तीचा खर्च ठेकेदारामार्फत करण्यात येतो. त्यामुळे शासनामार्फत सदर देखभाल दुरुस्तीसाठी कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

(३) राष्ट्रीय महामार्ग विभागाने बोगदा तज्ञ श्री. एस. के. धर्माधिकारी (MoRTH यांचे सल्लागार) यांनी या समस्येचे निराकरण करण्यासाठी घटनास्थळी दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी भेट दिली. त्यानुसार त्यांनी गळती रोखण्यासाठी सुमारे ३० ठिकाणी सिमेंट ग्राउटिंगचे काम करण्याबाबतच्या सूचना दिल्या. त्यानुसार सुमारे ८०% सिमेंट ग्राउटिंगचे काम यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे आणि तेव्हापासून सदर ठिकाणी कोणतीही गळती आढळून आलेली नाही. उर्वरित गळती होणाऱ्या ठिकाणी काम प्रगतीपथावर आहे. याव्यतिरिक्त, राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या विनंतीनुसार, आयआयटी मुंबईचे प्रा.डी.एन.सिंग यांनी दिनांक ३० मार्च, २०२४ व २८ फेब्रुवारी, २०२५ रोजी घटनास्थळाला भेट देऊन बोगद्याच्या आतील ठिकाणांव्यतिरिक्त बोगद्याच्या वर काही ठिकाणी सिमेंट ग्राउटिंगचे काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार त्यांचे मार्गदर्शनाखाली सदर ठिकाणी काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयात शीतपेयात डिप्रेशनच्या गोळया टाकून विक्री केली जात असल्याबाबत

**(१०) ८२२८ (१९-०९-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात शीतपेयात डिप्रेशनच्या गोळया टाकून शीतपेय विक्री केली जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंमली पदार्थविरोधी मोहिम उघडणाऱ्या रत्नागिरी पोलिसांनी नशेच्या या नव्या प्रकाराला आळा घालण्यासाठी कडक पावले उचलून २४ तास औषधे विक्री करणाऱ्या मेडिकल स्टोअर्सना रात्री ११ नंतर शीतपेये विकण्यास बंदी घातली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंदीचे पालन न करणाऱ्या मेडिकल स्टोअर्सवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) रत्नागिरी पोलीसांनी २४ तास औषधे विक्री करणा-या मेडिकल स्टोअर्सना रात्री ११ नंतर औषधांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वस्तू विकण्यास बंदी घातली आहे.

तसेच औषधांचा नशेसाठी संभाव्य गैरवापर टाळण्याच्या उद्देशाने अन्न व औषध प्रशासन, रत्नागिरी यांनी २४ तास कार्यरत मेडिकल स्टोअर्सनी रात्री ११ नंतर कोणतेही खाद्य पदार्थ विकू नये अशा प्रकारचे परिपत्रक काढलेले आहे. सदर परिपत्रकांत निर्देशित सुचनांचे अनुपालन न केल्याच्या घटना आढळून न आल्याने अन्न व औषध प्रशासनामार्फत कोणतीही कार्यवाही घेण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौडामार्ग (जि.सिंधुदूर्ग) येथे विनापरवाना खैराची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याबाबत**

**(११) ८२३१ (१९-०९-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) मध्ये कत्तलीसाठी गुरांची वाहतूक होत असल्याचा संशय आल्याने गोरक्षकांनी पाठलाग करुन पकडलेल्या टेम्पोतून खैराची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वाहतूक करणाऱ्या आरोपीस अटक करुन चौकशी केली असता, त्याच्या व्हॉटसअ‍ॅपवर पिस्तुलासारख्या हत्याराचे विविध व्हिडीओ आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह खैराची वाहतूक रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२१-०१-२०२६) :** (१), (२), (३), (४) उपवनसंरक्षक, सावंतवाडी यांनी कळविल्यानुसार दिनांक २६.०४.२०२५ रोजी दोडामार्ग वनपरिक्षेत्र अखत्यारितील मौजे मणेरी तळेवाडी येथील श्री. अफसान कादर यांच्या घराशेजारी उभ्या वाहनात तपासणीअंती खैर प्रजातीचा माल विनापरवाना आढळून आला आहे. त्यानुसार सदरचा माल व वाहन जप्त करण्यात आले आहे.

तथापि, सदरच्या प्राथमिक चौकशीत जप्त खैर माल खाजगी/मालकी क्षेत्रातील असून विनापरवाना वृक्षतोड व विनापरवाना वाहतूक संबंधित वन कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हा दाखल असुन या प्रकरणी चौकशी अंतीम टप्प्यात आहे. उक्त चौकशी दरम्यान आरोपी यांचा मोबाईल /व्हॉटसअ‍ॅप तपासण्यात आले नसल्याचे वस्तुस्थिती आहे. तसेच संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यात विनापरवाना लाकूड माल वाहतूक सारख्या अवैध घटनांना आळा घालण्यासाठी कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याची बाब उपवनसंरक्षक, सावंतवाडी यांनी कळविलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात कृषी विभागातील बहुतांश अधिकाऱ्यांनी कृषी निविष्ठा उत्पादन कंपन्यांमध्ये केलेला गैरव्यवहार**

**(१२) ८२४६ (०८-०९-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी विभागातील बहुतांश अधिकाऱ्यांनी त्यांच्या नातेवाईक व मित्रांच्या नावावर बेनामी खते, किटकनाशके, औषधे व बियाणे इत्यादी कृषी निविष्ठा उत्पादन कंपन्या असल्याचे पत्र लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ मार्च,

२०२५ रोजी वा त्यादरम्यान कृषी विभागास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कृषी अधिकारी व कर्मचारी त्यांच्या नातेवाईकांच्या व जवळच्या मित्रांच्या नावावर कृषी निविष्ठा उत्पादन करणाऱ्या कंपन्या स्थापनेकरीता त्यांनी नियुक्ती प्राधिकारी यांची परवानगी घेतली होती काय,

(३) असल्यास, कृषी अधिकारी व कर्मचारी यांच्या संबंधित असणाऱ्या कंपन्यांच्या वर्षनिहाय रकमेत गैरव्यवहार होऊन त्या कंपन्याबाबत खते, बियाणे व औषधे कायद्यानुसार झालेल्या उत्पादनाचे बॅच व लॉट निहाय नमुने काढून तपासणी केली आहे काय,
(४) असल्यास, या कंपन्या गैरव्यवहार मार्गाने केलेल्या गुंतवणूकीबाबत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची आयकर, गृह लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मधील अधिकाऱ्यांची विशेष तपास पथक नेमून चौकशी करण्याकरिता त्यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी विभागातील बहुतांश अधिकाऱ्यांनी कृषी निविष्ठा उत्पादन कंपन्यांमध्ये केलेल्या गैरव्यवहाराबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (०९-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम १६ (२) अन्वये प्रत्येक शासकीय कर्मचारी त्याच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती, एखाद्या व्यापारात किंवा धंद्यात गुंतलेली असेल किंवा एखाद्या विमा एजन्सीचे किंवा कमिशन एजन्सीची मालक असेल किंवा व्यवस्था पहात असेल, तर तो तसे शासनाला कळवील अशी तरतुद आहे.

सदर तरतूद व तक्रारीतील मुद्दे विचारात घेता, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करण्यात आली असून, चौकशीमधील निष्कर्षाच्या अनुषंगाने १) श्री. किरण शामराव जाधव, तत्का.कृषी उपसंचालक, दक्षता पथक, कृषी आयुक्तालय, पुणे २) श्री. नरेंद्र बारापात्रे, तत्का.तंत्र अधिकारी, दक्षता पथक, कृषी आयुक्तालय, पुणे ३) श्री. आण्णासाहेब आत्माराम बारवकर, तत्का.कृषी अधिकारी (विघयो), पंचायत समिती, तासगाव, जिल्हा परिषद सांगली यांच्याविरूध्द कृषि आयुक्तालयाचे ज्ञापन दिनांक १८.०७.२०२५ अन्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. तसेच श्री.उमेश पाटील,तत्का.विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर (सेवानिवृत्त) यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

सदर प्रकरणी प्राप्त सर्व तक्रारींच्या अनुषंगाने श्री.किरण शामराव जाधव, तत्कालीन कृषी उपसंचालक, दक्षता पथक व तत्कालीन तंत्र अधिकारी, खते संचालक गुणनियंत्रण यांच्याविरुध्द अपसंपदा आणि भ्रष्टाचारविषयक तक्रारीबाबत तसेच कृषि विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी बेकायदेशिरपणे सुरु केलेले कृषि निविष्ठा उत्पादक कंपन्या व विक्री केंद्रे यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सखोल तपासणी करून त्याबाबतचा चौकशी अहवाल शासनास सादर करण्याबाबत लाचलुचपत प्रति प्रतिबंधक विभागास (A.C.B) गृह विभागाच्या दिनांक २६.०८.२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

कृषि विभागातील विविध योजनांमधील गैरव्यवहार तसेच शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी बेकायदेशीरपणे सुरु केलेल्या कृषि निविष्ठा व उत्पादक कंपन्या आणि विक्री केंद्रे यांच्या चौकशीसाठी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने आणि कृषि विभागाच्या विविध योजनांमधील गैरव्यवहारासंबंधी प्राप्त गंभीर स्वरुपाच्या इतर तक्रारींच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशीसाठी विशेष चौकशी अधिकारी म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या डॉ. उमाकांत दांगट यांची नियुक्ती शासन आदेश दिनांक २४.०६.२०२५ रोजी करण्यात आली आहे. तसेच शासन आदेश दिनांक ०४.११.२०२५ च्या शासन आदेशान्वये डॉ.उमाकांत दांगट यांची नियुक्ती रद्द करून त्यांच्याऐवजी श्री.निरंजन कुमार सुधांशू (भाप्रसे), महासंचालक, यशदा, पुणे यांची नियुक्ती करण्यात आली असून चौकशीची कार्यवाही कार्यान्वित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बोरगाव अंजनपूर निम्न पातळी बंधारा (ता. जि. लातूर) प्रकल्पाचे उभे उचलद्वार दुरुस्तीबाबत**

**(१३) ८२८६ (३०-०७-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगाव अंजनपूर निम्न पातळी बंधारा (ता. जि. लातूर) या प्रकल्पाचे द्वार क्षतिग्रस्त झाल्यामुळे द्वार दुरुस्तीसाठी मुळी बंधाऱ्याच्या धर्तीवर नवीन उभे उचल द्वारे बसविण्याचे अंदाजपत्रक व अस्तित्वातील गोडबोलेद्वारा ऐवजी प्रस्तावित उभ्या उचल व्दारांच्या प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव त्रुटी पूर्तता करून मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विशेष दुरुस्तीच्या प्रस्तावास त्वरित मंजुरी मिळावी, यासाठी लोकप्रतिनिधींनी कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचेकडे दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे वेळोवेळी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोरगाव-अंजनपूर बंधाऱ्यावरील नवीन उभे उचलद्वार बसविण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्यास नेमका विलंब होत असून यासंदर्भात बैठक कधी घेण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक १० मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

मा. लोकप्रतिनिधींनी बोरगाव-अंजनपूर निम्न पातळी बंधाऱ्यास मुळी बंधाऱ्याच्या धर्तीवर नवीन उभी उचल द्वारे बसविण्याच्या विशेष दुरूस्ती अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत सन २०२३ पासून मागणी केली आहे.

(३) जलसंपदा विभाग, शासन निर्णय दिनांक ०४/०९/२०२५ अन्वये बोरगाव-अंजनपूर ता. जि. लातूर येथील निम्न पातळी बंधाऱ्यातंर्गत नवीन उभी उचलद्वारे बसविण्याच्या कामास विशेष दुरूस्ती अंतर्गत रु. १३.९० कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

(४) हे खरे आहे.

मा. लोकप्रतिनिधींनी दिनांक १० मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये अंदाजपत्रकास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे.

(५) व (६) सदर प्रस्तावास शासनाकडून वर नमूद केल्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता प्राप्त असून सन २०२५-२६ चे येत्या हिवाळी अधिवेशनात या कामासाठी लाक्षणिक तरतूद (टोकन तरतूद) करणेबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे.

## जोगेश्वरी गुंफेवरील मोकळया जागेत थीमपार्क बनविण्याबाबत

**(१४) ८३२६ (१९-०९-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील जोगेश्वरी गुंफेवरील मोकळया जागेत थीमपार्क बनविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयाकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मोकळया जागेवर थीमपार्क उभारल्यास प्राचीन गुंफेचे संरक्षण व संवर्धन, जतन होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासन स्तरावर प्राचीन गुंफेचे संरक्षण व संवर्धन, जतन करण्यासाठी थीमपार्क उभारण्यास कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे

मा. लोकप्रतिनिधीचे दिनांक १८.०२.२०२५ रोजी चे पत्र महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या समवेत झालेल्या संयुक्त बैठकीदरम्यान जोगेश्वरी गुंफा येथे न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जागा मोकळी करून तेथे थीमपार्क बनविणे, पर्यटन स्थळ बनवून गुंफेचे जतन करण्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

(२) गुंफेचे संरक्षण, संवर्धन व जतन ही बाब भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग यांच्या अखत्यारीत येते.

(३) विकास आराखडा २०३४ नुसार के/ पूर्व विभागातील जोगेश्वरी गुंफेच्या आजूबाजूची जमीन ही ROS१.५ (उद्यान/बगीचा) या आरक्षणाने बाधित आहे. सदर जमिनेचे भूसंपादन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत २०१९ पासून या कार्यालयास विनंती करण्यात आलेली होती.

विषयांकित प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहितार्थ रिट याचिका २४४५/२००४ दाखल झालेली होती. सदर याचिकेत तत्कालीन सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ०५.०८.२००८ रोजी प्रतिज्ञापत्र सादर केले होते. सदर प्रतिज्ञापत्रात भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागास भूसंपादनाकरिता मंजूरी घेण्याबाबतचा सल्ला तत्कालीन सचिव यांनी दिला होता.

सदर उद्यान/बगीचाचे आरक्षण जोगेश्वरी गुंफेच्या १०० मी प्रतिबंध क्षेत्रात येते. Ancient Monuments Archaeological Sites and Remains Act, १९५८ मधील तरतुदीनुसार पुरातन जागेलगतच्या जमिनींचे भूसंपादन ही भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाची जबाबदारी आहे. तदनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेने विविध पत्रान्वये दिनांक ०५.०८.२००८ रोजीच्या प्रतिज्ञापत्राच्या अनुषंगाने भूसंपादनाच्या केलेल्या कार्यवाहीच्या सद्यस्थितीबाबत कळविण्याबाबत सातत्याने विनंती केलेली आहे.

(४) सदर प्रकरणी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाकडून अभिप्राय अप्राप्त असल्यामुळे सदर भूसंपादन प्रलंबित आहे.

---

## मुल शहरात राष्ट्रीय महामार्गावर रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(१५) ८३३७ (२३-०८-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर, गडचिरोली या राष्ट्रीय महामार्गावर मुल शहराजवळ असलेल्या रेल्वे कॉसींगवर सतत सुपर फास्ट रेल्वे व मालगाडया जात असल्याने बंद राहणाऱ्या रेल्वे फाटकामुळे होणारी वाहतुक कोंडी लक्षात घेता सदर ठिकाणी रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम करण्याची मागणी नागरिकांची आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबत मा. मुख्यमंत्री यांना दिनांक १३ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-१०-२०२५) :** (१) हो, खरे आहे.
छत्तीसगड राज्यसिमा मुरूमगाव-धानोरा-गडचिरोली-मुल-चंद्रपूर-वरोरा-करंजी हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ९३० असून राष्ट्रीय महामार्ग (सा.बां) विभागाकडे देखभाल व दुरुस्ती करिता आहे.
(२) हो, खरे आहे.
(३) मुल शहरातून राष्ट्रीय महामार्ग क्र. ९३० चे पक्क्या गटारासह सिमेंट काँक्रीट रस्त्याचे चौपदरीकरण करण्यात आलेले आहे. गडचिरोलीकडून मूल शहरात जाण्याकरीता रेल्वे मार्ग ओलांडून जावे लागत असल्यामुळे, राष्ट्रीय महामार्ग क्र. ९३० वर साखळी क्र. २३२/७४१ मध्ये रेल्वे उडाणपुलाचे बांधकाम करण्याकरीता विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठीची निविदा प्रक्रिया मुख्य अभियंता तथा क्षेत्रिय अधिकारी, रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालय मुंबई, यांचे मार्फत प्रगतीत असून ही निविदा प्रक्रिया पूर्ण होताच कंत्राटदाराची नेमणूक करून विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम तात्काळ सुरू करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनेक जिल्ह्यातील ग्रामीण भागात पशुवैद्यकीय दवाखान्यात मनुष्यबळ व इतर सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१६) ८३४९ (०९-१०-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: परभणी, अहिल्यानगर, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात पशुवैद्यकीय दवाखाना, दवाखान्यात मनुष्यबळ व इतर सोयी-सुविधांचा अभाव असल्याने जनावरांवर योग्य औषधोपचार मिळत नसल्याने पशुपालकांना औषधोपचार व शस्त्रक्रियेसाठी खासगी दवाखान्यात जावे लागत असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यात १७६ पशुवैद्यकीय दवाखान्यांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असतानाही जिल्ह्यातील वाढत्या पशुधनाचा विचार करता प्रस्तावास मान्यता देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मौजे नंदगाव, (ता.तुळजापूर, जि.धाराशिव) येथे पशुवैद्यकीय दवाखान्यास खास बाब म्हणुन मंजुरी मिळणेबाबत लोकप्रतिनिधिनी दिनांक १० मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली असून नंदगांव सह बोरगांव, हंगरगा नळ, लोहगांव, वागदरी, दहिटणा, यडोळा इत्यादी गावातील जवळपास ५२०० पशुधन व पशू पालकांची गैरसोय टाळण्यासाठी लोकप्रतिनिधिनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी चौकशी/ तपासणी करून दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या सुधारित आकृतिबंधानुसार अहवाल शासनास तात्काळ सादर करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना शासन स्तरावरून देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, मौजे गायगव्हाण (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथे ही पशुवैद्यकीय दवाखान्यांची मागणी वांरवार होत असतांना ती मंजूर करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यात श्रेणी-१ साठी रु.२ लाख, श्रेणी-२ साठी १ लाख, औषधी खरेदीसाठी अनुदान दिले जाते परंतु २०१९ च्या पशुगणनेनुसार राज्यातील एकूण पशुची संख्या १९.५० असून श्रेणी-१ चे १७४१ पशु वैद्यकीय दवाखाने व श्रेणी-२ चे २८४१ दवाखाने असून वाढत्या पशुगणनेनुसार अनुदानात वाढ करण्यात यावी व अनुदान वेळेवर वितरीत न केल्याने शेतकऱ्यांना निधीच्या कमतरतेमुळे व औषधांच्या तुटवड्यामुळे स्वत: पैसे खर्च करावे लागत असून त्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने सखोल चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१२-२०२५) :** (१) राज्यातील सर्व पशुवैद्यक संस्थांमध्ये पशुआरोग्य सेवा पुरविण्यासाठी सेवा- सुविधा, उपकरणे तसेच औषधे नियमितरित्या उपलब्ध करुन देण्यात येतात.

(२), (३) व (४) अहिल्यानगर जिल्हयात सद्यस्थितीत २०८ पवैद, १३ ता.प.चिकित्सालय व १४ फिरती पशुचिकित्सालये कार्यरत आहेत. देशात नुकतीच २२ वी पशुगणना करण्यात आली असून पशुगणनेनुसार पशुधन संख्या विचारात घेऊन पशुधन घटक समानीकरण व कार्यक्षेत्राची फेररचना करण्यात येईल.

(५) व (६) यापूर्वी औषध खरेदीसाठी पशुवैद्यकीय संस्थानिहाय अनुदान मंजूर करण्यात येत होते. त्यामध्ये बदल करुन शासन निर्णय दिनांक २३/०५/२०२५ अन्वये पशुवैद्यकीय संस्थांच्या कार्यक्षेत्रातील पशुधन संख्या, गेल्या तीन वर्षातील दैनंदिन रुग्ण सरासरी, उद्भवलेले साथरोग, उपलब्ध औषधसाठा इ. विचारात घेवून निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

---

## सोलापूरच्या सिद्धेश्वर तलावाची स्वच्छता व सुशोभीकरण करण्याबाबत

**(१७) ८३७० (०९-१०-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.देवेंद्र कोठे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील ग्रामदैवत असणाऱ्या सिध्देश्वर तलावात जलप्रदूषण वाढल्याने हजारो मासे व ५५ कासवांचा दूषित पाण्यामुळे मृत्यू झाला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूषित पाण्यामुळे मासे व कासव मृत्युमुखी पडत असल्याने तलावात मिसळणारे दूषित पाणी थांबवून तलाव स्वच्छ करण्याची मागणी नागरिकांकडून व लोकप्रतिनिधींकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह सिध्देश्वर तलाव स्वच्छ करून तलावाचे सुशोभीकरण करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांमार्फत दिनांक १४/०५/२०२५ रोजी सिद्धेश्वर तलाव व परिसराची पाहणी करण्यात आलेली होती.

सदर पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने पाण्याची गुणवत्ता सुधारण्याकरिता योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत सोलापूर महानगरपालिका व श्री. सिध्देश्वर देवस्थान समिती यांना मंडळाकडून दिनांक १४/०५/२०२५ रोजी समजपत्र बजावण्यात आले असून सदर प्रकरणी सोलापूर महानगरपालिका व श्री. सिध्देश्वर देवस्थान समिती यांना दिनांक १३/०६/२०२५ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त प्रस्तावित आदेश बजाविण्यात आले आहेत.

सदर घटनेच्या अनुषंगाने मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९/०६/२०२५ रोजी तलावातील प्रदूषण रोखणेकामी संबंधित विभागांची बैठक घेण्यात आली असून तलावातील पाण्याची गुणवत्ता व ऑक्सिजनची पातळी तातडीने सुधारणेकामी उपाययोजना करण्याबाबतच्या सूचना संबंधित विभागास देण्यात आल्या आहेत.

सोलापूर महानगरपालिकेद्वारे श्री. सिध्देश्वर तलावातील पाण्याची तपासणी करण्यात आलेली असुन तलावात एरीएशन सिस्टम सोलापूर महानगरपालिकेमार्फ़त तात्काळ चालू करण्यात आली आहे.

श्री. सिध्देश्वर देवस्थान तलावातील पाण्याची ऑक्सीजनची पातळी वाढविणेकामी, हेलिया यूनी-क्लीयर या कल्चरचा श्री. सिद्धेश्वर तलाव समितीच्या सहमतीने डेमो स्वरुपात वापर केला असता श्री. सिध्देश्वर देवस्थान तलावातील पाण्याच्या गुणवत्तेमध्ये बदल दिसुन आला असल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शाळांतील मुलांच्या सुरक्षिततेबाबत समितीच्या अहवालबाबत

**(१८) ८३८० (१९-०८-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर येथील शाळेमध्ये दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराची घटना घडल्यानंतर राज्यातील शाळा व इतर शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या दोन निवृत्त न्यायमूर्तींच्या समितीने माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये राज्य शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सादर केलेल्या अहवालामध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात समितीने कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(३) असल्यास, अहवालातील कोणत्या शिफारसी शासनाने स्वीकारल्या असून त्यानुषंगाने शासनाने कोणती अंमलबजावणी केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२१-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) बदलापूर, ता. अंबरनाथ येथील दुर्दैवी घटनेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून सु-मोटो जनहित याचिका क्र. १/२०२४ दाखल करुन घेण्यात आली. सदर सु-मोटो जनहित याचिकेच्या अनुषंगाने सेवानिवृत्त न्यायाधीश, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन

निर्णय / परिपत्रके यांमधील सूचना व मा. सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेता, राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात एकत्रितरित्या सर्वसमावेशक सूचना दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचना खालील मुद्दांच्या अनुषंगाने आहेत-

१. लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२' मधील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करणे.

२. शाळेतील विद्यार्थ्यांवरील होणाऱ्या अत्याचाराची तक्रार POCSO e-Box व CHIRAG या ॲपवर करणे

३. राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये तक्रार पेटी बसविणे.

४. शाळांमध्ये सखी-सावित्रीचे गठन करण्याबाबतची कार्यवाही करणे.

५. शाळा व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे.

६. कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी नियुक्तीपूर्वी काटेकोरपणे करणे.

७. विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसंदर्भातील सुरक्षिततेच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.

८. शाळेतील मुली व मुलांकरिता स्वतंत्र प्रसाधनगृह / स्वच्छतागृह असणे.

९. शाळेत येणाऱ्या अभ्यागतांसाठी आचारसंहिता लागू करणे.

१०. सायबर हल्ले व धोके टाळण्याच्या अनुषंगाने शाळा / पालकांनी कार्यवाही करणे.

११. क्षमता निर्माण आणि प्रशिक्षण यासंदर्भात कार्यवाही करणे.

१२. विद्यार्थी सुरक्षा समितीचे गठन करणे.

१३. जिल्हा स्तरावरील विद्यार्थी सुरक्षा आढावा समितीचे गठन व विभागीय स्तरावरील पर्यवेक्षण करणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेच्या २७ शाळा बंद अवस्थेत असल्याबाबत

**(१९) ८३८७ (१९-०९-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या २७ शाळा बंद असून या शाळांच्या खिडक्या व दरवाजे चोरीला गेल्या असणे तसेच कोटयवधी रूपयांची मालमत्ता बेवारस पडून असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा गत १५ वर्षापासून बंद असून प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची संख्या देखील वर्षनिहाय कमी होत असून ती सन २०१४ मध्ये १४०२, सन २०१८ मध्ये १२०७ तर पाच वर्षाने या शिक्षकांची संख्या १९५ ने घटली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर बंद असलेल्या शाळा पूर्ववत सुरू करून त्या माध्यमातुन उत्तम दर्जेदार शिक्षण देण्याच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या २७ शाळा या शाळेतील पटसंख्या कमी झाली असून, शाळांच्या इमारतीही जीर्ण अवस्थेत व मोडकळीस आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या जिविताला धोका होऊ नये म्हणून शाळा जवळच्या शाळेत विद्यार्थी व शालेय अभिलेखासह स्थानांतरीत करण्यात आल्या आहेत. बंद असलेल्या शाळेत सुरक्षारक्षक नसल्यामुळे, काही प्रमाणात शाळांच्या तुटलेल्या खिडक्या व दरवाजे चोरीला गेल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

विहित तरतूदीन्वये शिक्षकांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्ष इतके आहे. ज्या शिक्षकांना वयाची ५८ वर्षे पूर्ण झाली आहेत, असे प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षक सेवानिवृत्त झाले आहेत. सबब प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची संख्या कमी झालेली आहे.

(३) नागपूर महानगरपालिकेमार्फत बंद/समायोजन केलेल्या शाळांमध्ये विधानसभा क्षेत्रनिहाय सहा इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून समाजातील सर्वच घटकांतील बालकांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येत आहेत, त्यांस परिसरातील पालकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून या शाळांची पटसंख्या वाढत आहे.

तसेच महानगर पालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या मिशन नवचेतना अंतर्गत, महानगरपालिकेच्या सर्व शाळांचे सर्वेक्षण करून आवश्यक त्या सर्व भौतीक सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. या मिशन अंतर्गत महानगरपालिकेच्या शाळांना डिजीटल स्मार्ट बोर्ड, ई-लायब्ररी व मुल्यांच्या सर्वांगिन विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. अशा प्रकारच्या उपाययोजना इतर बंद शाळेत करण्याचे नागपूर महानगरपालिकेमार्फत नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कृषी आयुक्तालयाच्या अखत्यारित असलेली रिक्त पदे भरण्याबाबत

**(२०) ८५३६ (२१-०७-२०२५). श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी आयुक्तालयाच्या अखत्यारित विविध आस्थापनेवर एकूण २७,५०२ कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असून त्यापैकी १८,३६९ कर्मचारी कार्यरत असून तब्बल ९,१३३ पदे रिक्त असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषतः ज्या कर्मचाऱ्यांचा शेतकऱ्यांशी थेट संबंध येतो, अशा गट-क मधील ५५६५ इतकी तर गट-ड मधील नाईक, शिपाई (१,९८९), क्लीनर माळी (५५९), प्रशिक्षित मजूर (२९९), मदतनीस, परिचरांचीही ही पदे भरण्यात आली नसल्याचे १० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदांमध्ये अद्याप संचालक आणि कृषी सहसंचालक यांची पदे रिक्त असून याशिवाय प्रशासकीय अधिकारी, लेखा अधिकारी या पदांवर अन्य पदांचाही समावेश असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपुऱ्या संख्येने कार्यरत असल्यामुळे विभागीय कामकाजावर परिणाम होत असून सर्व पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१८-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
माहे सप्टेंबर, २०२५ अखेर गट क संवर्गातील २०५४३ पदांपैकी १५२१२ पदे भरलेली असून, ५३३१ पदे रिक्त आहेत.

शा.नि. वित्त विभाग दिनांक ३१/१०.२०२२ नुसार गट-ड संवर्गातील पदे भरण्यास निर्बंध आहेत. तसेच गट-क संवर्गातील वाहनचालक पदांच्या पदभरतीस निर्बंध असल्याने सदरची पदे कंत्राटी स्वरुपात भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) संचालक संवर्गातील पदोन्नतीची १० पदे पदे मंजूर असून सद्यस्थितीत ५ पदे भरलेली असून ५ पदे रिक्त आहेत. सद्यस्थितीत रिक्त असलेल्या ७ पदांवर पदोन्नतीसाठी आवश्यक असलेली निम्न संवर्गात ३ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेले अधिकारी उपलब्ध नसल्याने पदोन्नती देता अलेली नाही.

कृषी सहसंचालक संवर्गातील पदोन्नतीची १९ पदे मंजूर असून सद्यस्थितीत १२ पदे भरलेली असून ७ पदे रिक्त आहेत. रिक्त असलेली पदे निवडसूची वर्ष च्या निवडसूचीमधून २०२५-२६ भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र कृषी सेवा गट-अ (प्रशासकीय सेवा) संवर्गातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची २ पदे मंजूर असून ती भरलेली आहेत. प्रशासकीय अधिकारी संवर्गाची सरळसेवेची मंजूर ५ पदे व पदोन्नतीची मंजूर ६ पदे अशी एकूण ११ पदांपैकी सरळसेवेची ३ व पदोन्नतीच ४ अशी एकूण ७ पदे भरलेली आहेत.

(४) कृषी विभागातील रिक्त असलेली पदे वेळोवेळी सरळसेवा भरती प्रक्रियेने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे. रिक्त असलेल्या पदाचा पदभार इतर कार्यरत कर्मचाऱ्यांवर सोपवून कामकाज सुरळीतपणे पार पाडले जात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य कर्मचारी विमा योजना ( ईएसआय ) अंतर्गत चालविण्यात येत असलेले दवाखाने व रुग्णालये सर्व सोयी-सुविधायुक्त अद्यावत करणेबाबत

**(२१) ८५४५ (२५-०९-२०२५). श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य कर्मचारी विमा योजना (ईएसआय) अंतर्गत चालविण्यात येणारे दवाखाने, रुग्णालयांच्या इमारती, वैद्यकीय उपकरणे यांची दूरवस्था झाली असून या रुग्णालयात डॉक्टर, परिचारिका व इतर कर्मचाऱ्यांचा अभाव तसेच कामगार व त्यांच्या कुटुंबियांना योग्य पध्दतीने उपचार उपलब्ध होत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकरिता कामगार व उद्योजक यांच्यामार्फत राज्याला दरवर्षी ७०० कोटी रुपये दिले जातात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, योग्य सुविधा न मिळाल्यास, राज्यास देण्यांत येणारे कामगार योगदान बंद करण्याबाबत कामगार संघटना कृती समितीने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्य कर्मचारी विमा योजना ( ईएसआय ) अंतर्गत चालविण्यात येत असलेले दवाखाने व रुग्णालये अद्यावत तसेच आरोग्य विषयक सोयी-सुविधा उपलब्ध करण्यबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०९-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) राकावि योजनेअंतर्गत कामगार व उद्योजक यांच्याकडून प्राप्त होणारी वर्गणी ही शासनाकडे जमा होत नसुन ती थेट केंद्र शासनाच्या अधिनस्थ राज्य कामगार विमा महामंडळाकडे जमा होते. राज्यात सद्यस्थितीत ४८,७०,४६० नोंदणीकृत विमाधारक असून सन २०२३-२४ मध्ये रू.२९४५.७८ कोटी इतकी वर्गणी राकावि महामंडळाकडे जमा झालेली आहे.
(३) प्रश्नाधीन विषयाबाबतचे निवेदन राज्य कामगार विमा महामंडळाकडे प्राप्त झालेले नाही.
(४) सर्व राकावियो रूग्णालयांच्या इमारतींची स्थिती, औषधी, वैद्यकीय उपकरणे व यंत्रसामुग्री याची उपलब्धता व पदांची स्थिती या बाबत मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांच्याकडे वेळोवेळी आढावा बैठका घेण्यात आलेल्या आहेत. सदर बैठकांतील निर्देशांनुसार सर्व सेवा दवाखाने व रुग्णालयांमध्ये कामगारांकरीता आवश्यक त्या सर्व आरोग्य विषयक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही आयुक्तालय व रुग्णालयस्तरावर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे आनंदगाव (ता.माजलगाव, जि.बीड) येथील जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या कंत्राटदाराकडून दंड वसूली करणेबाबत**

**(२२) ८५५२ (१९-०९-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आनंदगाव (ता.माजलगाव, जि.बीड) जलजीवन मिशन अंतर्गत येथील पाणी पुरवठा योजनेच्या कंत्राटदाराने सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांच्या मालकीच्या रस्त्याच्या हद्दीमध्ये पाईपलाईन टाकल्या प्रकरणी उपविभागीय अभियंता यांनी दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या पत्रान्वये ६७,८५,०००/- रु. एवढा दंड निश्चित करून वसूली करण्याबाबत कार्यकारी अभियंता, ग्रामपंचायत पाणीपुरवठा विभाग, (जि.प.बीड) यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त कंत्राटदारावर कारवाई करुन दंड वसूली करणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०८-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगांव यांनी दिनांक २९.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना रु.६७,८५,०००/-दंड भरणा करण्याबाबत कळविले आहे.
(२) जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मौजे आनंदगाव नळ पाणी पुरवठा योजनेबाबत जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग स्तरावर दिनांक १३.०६.२०२५ रोजी चौकशी समिती जिल्हा परिषद, बीड यांनी

स्थापन केली असून चौकशी समितीने दिनांक १८.०६.२०२५ रोजी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने मोगरा (शिवाजीनगर तांडा)-डाकेपिंपरी कॅम्प (साठेनगर) ते डिग्रस पर्यंत झालेली अशुध्द उध्दरण वाहिनी ही रस्त्याच्या साईड पट्टी मध्ये न करता साइड पट्टीच्या बाहेरील बाजुने केले असून शिवाजीनगर तांडा येथे अंदाजे १५० मीटर पाईपलाईन जागेची अडचण असल्यामुळे साईड पट्टी लगत करण्यात आली आहे. सदर कामामुळे इतर जिल्हामार्ग ७८ मोगरा (शिवाजीनगर तांडा)-डाकेपिंपरी-डिग्रस खतगव्हाण रस्त्याचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही. त्यामुळे चौकशी समितीनी दिनांक १८.०६.२०२५ रोजी केलेल्या पाहणी अहवालानुसार रु.६७,८५,०००/- इतका दंड वसुल करण्याची आवश्यकता नसले बाबत जिल्हा परिषदेमार्फत सार्वजनिक बांधकाम विभागास दिनांक २४.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नळदुर्ग (ता.तुळजापूर जि.धाराशिव) येथे महावितरणाचे उपविभागीय कार्यालय सुरू करण्याबाबत

**(२३) ८५७८ (०७-०८-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुळजापूर (जि.धाराशिव) तालुक्यातील लातूर परिमंडळ अंतर्गत तुळजापूर उपविभागाचे विभाजन करून नवीन नळदुर्ग उपविभागाची निर्मिती करणे बाबतचा प्रस्ताव त्रुटींची पूर्तता करून दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजी महावितरण कार्यालय, मुंबई येथे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उप विभागीय कार्यालय तुळजापूर अंतर्गत तुळजापूर शहर, साधारणत: ३० हजार लोकसंखेचे नळदुर्ग शहर व अनेक गावे, तांडे व वस्त्या असून नळदुर्ग परिसरातील अनेक तांडे व वस्त्यावरील ग्राहकांना महावितरण संदर्भातील महत्वाच्या कामानिमित्त ६० ते ६५ किमी दूर तुळजापूर येथे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील ग्राहकांची गैर सोय टाळण्यासाठी नळदुर्ग येथे महावितरणचे नवीन उप विभागीय कार्यालय मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ मे, २०२३ व ०७ ऑगस्ट, २०२४ मध्ये शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी लातूर परिमंडळ अंतर्गत तुळजापूर उपविभागाचे विभाजन करून नवीन नळदुर्ग उपविभागाची निर्मिती करण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) महावितरण कंपनीच्या लातूर परिमंडळातील धाराशिव मंडळांतर्गत तुळजापूर उपविभागाचे विभाजन करुन नवनिर्मित नळदुर्ग उपविभाग कार्यालय निर्माण करण्याबाबतचा आदेश महावितरण कंपनीच्या मुख्य कार्यालयामार्फत दिनांक ०१.०८.२०२५ नुसार निर्गमित करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाथरी मानवत सोनपेठ दैठणा येथे पोलीस स्टेशन इमारत व निवासस्थानी बांधकाम करण्याबाबत

**(२४) ८५८७ (०८-०९-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनपेठ व दैठणा (ता.पाथरी-मानवत, जि.परभणी) येथे पोलीस स्टेशन इमारत व निवासस्थानी बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे मे, २०२५ मध्ये मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्रकरणी अधीक्षक अभियंता मुख्यालय-२, पोलिस गृहनिर्माण महामंडळ यांनी पोलिस महासंचालक मुंबई यांना सदरील प्रस्तावांची शासनाच्या यादीत समावेश करण्यात येऊन प्राधान्याने निधी वितरीत करण्यात यावा असे कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-११-२०२५) :** (१) व (२) होय.

(३) गृह विभाग, शासन पत्र दिनांक २४/०९/२०२५ अन्वये मंजूर केलेल्या पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून करावयाच्या कामाच्या प्राधान्यक्रम यादीमध्ये सोनपेठ, पोलीस ठाणे येथे पोलीस प्रशासकीय इमारत व १९ निवासस्थाने आणि दैठणा, पोलीस ठाणे येथे प्रशासकीय इमारत व १२ निवासस्थाने बांधकामाचा प्रकल्पाचा समावेश आहे. प्राधान्यक्रम व निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील बायोगॅस (सीबीसी) प्रकल्प जमीन हस्तांतरण मंजुरी अभावी प्रंलबित असल्याबाबत

**(२५) ८६०२ (०८-०९-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कचरा विल्हेवाटीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्या कचऱ्यापासून बायोगॅस (सीबीसी) तयार करण्याचे नियोजन गॅस लिमिटेड व मुंबई महापालिकेने केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचऱ्यापासून बायोगॅस तयार करण्याचे तंत्रज्ञान महानगर गॅसकडे असून महानगरपालिकेच्या सहकार्याने बायोगॅस निर्मिती प्रकल्प उभा करण्यासाठी महानगर गॅस व महानगरपालिकेने माहे जून, २०२३ मध्ये करार केला असून मात्र जमीन हस्तांतरण मंजुरीअभावी हा प्रकल्प प्रलंबित आहे, हे खरे आहे काय ,

(३) असल्यास, हा प्रकल्प दोन टप्प्यांत उभा होणार असून या दोन्ही टप्प्यांसाठी १८ एकर जमिनीची आवश्यकता असून ही जमीन महानगरपालिकेची असेल, मात्र जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव माहे मार्च, २०२५ पासून राज्य शासनाकडे मंजुरी साठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन जमिन हस्तांतरणाच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

बायोगॅस निर्मिती प्रकल्प उभा करण्यासाठी महानगर गॅस व महानगरपालिकेने माहे जून, २०२३ मध्ये करार केला असून दिनांक २८.०५.२०२५ रोजीचे शासन निर्णयाद्वारे देवनार, मुंबई येथील कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पासाठी १८ एकर क्षेत्र भाडेपट्ट्याने देण्यास शासनाने मान्यता देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मोतीबिंदूमुक्त महाराष्ट्र हे मिशन यशस्वी रित्या राबविण्याबाबत

**(२६) ८६०४ (३०-०७-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा

करतील काय :-

(१) मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहिनता आणि त्यावर उपाययोजना म्हणून सन २०१७ पासून मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन सुरु करण्यात आले असून शासनाने हाती घेतलेल्या या मिशनची सन २०१८ मध्ये नव्याने सुरुवात करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र हे मिशन सन २०२७ पर्यंत पूर्ण करण्यासाठी विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड ही संस्था इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांना मदत करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र हे मिशन सन २०२७ पर्यंत यशस्वीरित्या राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१३-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) शासन निर्णय क्रमांक. बैठक-१११७ /प्र.क्र.३४७/ अधिनियम, दिनांक २९.१२.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये "मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र" मिशन ची सुरुवात करण्यात आली. सदर मोहिम वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या मार्फत संयुक्तपणे राबविण्यात येत आहे.

मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन करीता राज्यस्तरीय समन्वयकांची नेमणुक करण्यात आली आहे.

सार्वजनिक आरोग्यविभागाने आवश्यकतेनुसार मनुष्यबळ व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहे.

सर्व शासकीय रुग्णालयातील व सर्व वैद्यकीय महाविद्यालयातील नेत्र शस्त्रक्रिया गृह मिशनसाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील व्यवसाय कर वसूलीचे काम राज्यात स्थानिक नागरी संस्था आणि पंचायत राज संस्था यांचेकडे हस्तांतरीत करण्याबाबत

**(२७) ८६०७ (१८-०८-२०२५). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तामिळनाडू, गुजरात व केरळ या राज्यांनी व्यवसाय कराचे संकलन स्थानिक स्वराज्य संस्थाकडे जबाबदारी दिली असून महाराष्ट्र शासनानेही व्यवसाय कर वसूलीचे काम राज्यात स्थानिक नागरी संस्था आणि पंचायत राज संस्था यांचेकडे हस्तांतरीत करण्याचा राज्य शासनाचा निर्णय विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विचाराधीन प्रस्तावाचे स्वरुप काय असून या प्रकरणी केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (१३-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

व्यवसाय कराचे राज्यशासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरण करण्यासाठी गुजरात राज्याने अवलंबिलेल्या प्रतिमानाचा /पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

(२) समितीने अद्याप अहवाल सादर केलेला नाही.

(३) समितीने अहवाल सादर केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सर्वच पिकांसाठी खरीप हंगामापासून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याकरीता शेतकऱ्यांना माहिती देण्याबाबत

**(२८) ८६७३ (२१-०७-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये सर्व पिकांसाठी खरीप हंगामापासून कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI in Farming) वापर करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता कृषी क्षेत्र संबंधित सल्ला देण्यासाठी केंद्र शासनाच्या विस्तार या संकेतस्थळाचा यासाठी वापर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना याबाबत माहिती देण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१०-०९-२०२५) :** (१) होय.

(२) होय.

(३) राज्य शासनाने केंद्र शासनाशी विस्तार उपक्रमाबाबत सामंजस्य करार केला आहे. तसेच, दिनांक २१ मे, २०२५ रोजी राज्यासाठी स्वतंत्र महा-विस्तार हे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित मोबाईल ॲप्लीकेशन उपलब्ध करुन दिलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील जुहू तारा रोड येथील "आजिवसन" या संस्थेला दिलेल्या शासकीय भूखंडाचा गैरवापर केल्याबाबत**

**(२९) ८६९३ (१९-०८-२०२५). श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुहू तारा रोड येथील सुप्रसिध्द गायक सुरेश वाडकर यांच्या "आजिवसन" या संस्थेने दिलेल्या शासकीय भूखंडाचा गैरवापर केल्याप्रकरणी मुंबई उपनगर जिल्हाधिका-यांनी चौकशी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने या संस्थेला दिलेल्या शासकिय भूखंडाचा गैरवापर करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी जिल्हधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २५/०३/२०२५ व दिनांक ०७/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला होता. संस्थेने केलेल्या शर्तभंगाबाबत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आवश्यक अधिमूल्य वसूल करुन शर्तभंग नियमानुकूल करुन देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार शासन पत्र, दिनांक १७/१०/२०२५ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोरवा (जि.चंद्रपूर) येथे अवैध डिझेल गोदामाला लागलेली आग**

**(३०) ८७०४ (१९-०९-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरवा (जि.चंद्रपूर) गावाजवळील अवैध डिझेल गोदामाला दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी भीषण आग लागून मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०२६) :** (१) चंद्रपूर जिल्ह्यातील मोरवा गावाजवळील एका ढाब्याच्या पाठीमागील मोकळ्या जागेत दिनांक ०५ मार्च, २०२५ रोजी अवैधरीत्या डिझेल व ऑईल या अत्यंत ज्वलनशील पदार्थाच्या खरेदी-विक्री वेळी गाडी चालू करीत असताना डिझेल टॅंकर व तेथे ठेवलेल्या लोखंडी ड्रम यांमध्ये स्पार्क होऊन आग लागली. सदर प्रकरणाची माहिती मिळताच पोलीसांनी तात्काळ अग्निशमन दलाला बोलावले व सदर आग विझविण्यात आली.

तथापि, सदर आगीमध्ये एक पेट्रोल टॅंकर व त्याच्या शेजारी उभे असलेले एक पिक-अप वाहन पूर्णपणे जळून खाक झाले. तसेच, सदर आगीमुळे शेजारच्या भंगार गोडाऊन बाहेर ठेवलेले भंगारही काही प्रमाणात जळाल्याने वित्तहानी झाली आहे.

(२) व (३) सदर प्रकरणातील पेट्रोल, टँकर चालकाने दुसऱ्या व्यक्तीकडून डिझेल खरेदी-विक्री करण्याकरिता अवैधरित्या साठवून ठेवल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्ह्यातील पेट्रोल टँकर वाहनचालक व अवैधरीत्या खरेदी करणाऱ्या व्यक्तीविरोधात पो. स्टे. पडोली, जि. चंद्रपूर येथे गु. र. क्र. ३४/२५ कलम १२५,२८७ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान दोन्ही आरोपींनी संगनमत करुन अवैधरित्या डिझेल व पेट्रोलची खरेदी-विक्री करिता साठवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सदर घटनास्थळावरुन मुद्देमाल जप्त करून सदर मुद्देमाल रासायनिक परिक्षणाकरिता न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जाखादेवी मंदिर शेजारी (प्रभादेवी, मुंबई) सुरू असलेल्या रुग्णालयाच्या बांधकामाच्या दर्जाबाबत चौकशी करण्यासंदर्भात

**(३१) ८७८१ (०८-०९-२०२५). श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील प्रभादेवी येथील गोखले मार्गावर, जाखादेवी म्युनिसिपल डिस्पेंसरी या रुग्णालयाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बांधकामाची गुणवत्ता तपासण्यासाठी अधिकृत सिव्हिल व स्ट्रक्चरल अभियंत्यांकडून निरीक्षण व तपासणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालयाच्या बांधकाम प्रक्रियेमध्ये तांत्रिक, प्रशासकीय किंवा आर्थिक अनियमितेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्टदर्जाच्या कामाबाबत संबंधीत दोषी ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) संरचनात्मक बांधकामाची तपासणी नियुक्त केलेल्या संरचनात्मक सल्लागारांकडून वेळोवेळी केली जाते तसेच संरचनात्मक बांधकाम पूर्ण झाल्यानंतर संरचनात्मक सल्लागारांकडून इमारतीचे स्थिरता प्रमाणपत्र घेण्यात येते.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेगाव ते खामगांव (जि.बुलढाणा) महामार्गावरील सिद्धीविनायक महाविद्यालयासमोर झालेल्या अपघाताबाबत

**(३२) ८७९१ (१९-०९-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेगाव ते खामगांव (जि.बुलढाणा) महामार्गावरील सिद्धीविनायक महाविद्यालयासमोर दिनांक ६ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या अपघातग्रस्त कारमध्ये पोलिसांना तब्बल ७० लाख रुपयांची रोकड आढळून आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी शेगाव ग्रामीण, पोलीस स्टेशन, बुलढाणा येथे भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २८१, १२५ (a), ३२४ (४) अन्वये अप.क्रं ११२/२०२५ नोंद करण्यात आला आहे. या घटनेत अपघातग्रस्त हुंडाई क्रेटा कारचे चालक यांचेकडून रुपये ७०,०४,५००/- रक्कम जप्त करण्यात आली असुन त्याबात सविस्तर जप्ती पंचनामा तयार करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी जप्त केलेली रोख रक्कम प्रारंभी शेगाव ग्रामीण, पोलीस स्टेशन येथे तात्पुरत्या स्वरूपात सुरक्षित ठेवण्यात आली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याशी पत्रव्यवहार करून, सदर रोख रक्कम पुढील आदेश होईपर्यंत जिल्हा कोषागार कार्यालय, बुलढाणा येथे जमा करण्यात आलेली आहे.

तसेच सदर प्रकरणाची माहिती शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे जावक क्रमांक ३१३/२०२५, दिनांक ०५/०४/२०२५ अन्वये आयकर विभाग, नागपूर यांना देण्यात आलेली असून, सद्यस्थितीत पुढील चौकशी आयकर विभाग, नागपूर यांचेकडे प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाण्याचे आमदार यांच्या मुलाच्या जीवाला धोका असल्याबाबत धमकीचे प्राप्त झालेले पत्र

**(३३) ८७९८ (१९-०९-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाण्याचे आमदार श्री.संजय गायकवाड यांना अज्ञान व्यक्तीने धमकीचे पत्र पाठविले असून सदरहू पत्रात मुलाच्या जीवाला धोका असल्याचे नमूद केले असून सदर प्रकरणी तातडीने चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी पोलिस महासंचालक आणि पोलिस अधिक्षक, बुलढाणा यांच्याकडे माहे एप्रिल, २०२५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती सत्वर कारवाई केली केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) श्री. संजय गायकवाड, मा. आमदार यांनी दिनांक ०८/०४/२०२५ रोजी पोलीस महासंचालक, मुंबई यांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बुलढाणा शहर यांना सविस्तर चौकशी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्याबाबत आदेश देण्यात आलेले असून चौकशी कार्यवाही सुरू आहे. चौकशीदरम्यान मा. आमदार महोदयांच्या अहवालासोबत जोडलेले पत्र हे निनावी स्वरूपाचे असल्याचे आढळून आले. सदर तक्रारीत नमूद इसमांचे जबाब घेण्यात आले असून त्यांनी आरोप फेटाळले आहेत. तथापि प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत सदर इसमांविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १२६ व १३५ अन्वये इस्तेगाशा दाखल करून प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच तक्रार अर्जात नमूद १ इसम फरारी असल्याने सदर इसमाकडे अधिक चौकशी करता आली नाही. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र धोकादायक व्यक्ती प्रतिबंधक कायदा अन्वये स्थानबद्धतेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे.

श्री. संजय गायकवाड, मा.आमदार यांना प्राप्त झालेल्या निनावी पत्राच्या अनुषंगाने, त्यांचे पुत्र श्री. मृत्युंजय गायकवाड, रा. शिवाजीनगर, बुलढाणा यांच्या जिवीतास धोका असल्याबाबत संबंधित पोलीस स्टेशन येथे कोणत्याही प्रकारची तक्रार दाखल झालेली नाही.

सदर निनावी अर्जाबाबत आवश्यक ती चौकशी करण्यात आली असून, त्याअनुषंगाने कोणताही ठोस पुरावा किंवा विश्वसनीय माहिती प्राप्त झालेली नसल्याने व त्यामध्ये कोणतीही दखलपात्र बाब निष्पन्न न झाल्याने सदर निनावी तक्रार अर्ज दप्तरी नोंद करून फाईल करण्याची विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देऊळगावराजा (जि.बुलढाणा) तालुका येथील अंढेरा पोलीस ठाण्यातील पोलिस शिपायाचा अपघात होऊन झालेला मृत्यू

**(३४) ८८०० (१९-०९-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) तालुका येथील अंढेरा पोलीस ठाण्यातील पोलिस शिपाई, श्री.भागवत गिरी अवैध दारुविक्रेत्यांचा पाठलाग करीत असतांना त्यांच्या दुचाकीला दुचाकीस्वार लाथ मारुन पळून गेले असता, त्यामध्ये पोलीस शिपाई यांचा भीषण अपघात होऊन मृत्यू झाला असल्याचे दिनांक २३ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करुन पोलिस शिपायाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी दिनांक २३.०३.२०२५ रोजी पोलीस ठाणे, अंढेरा, जि. बुलढाणा येथे फिर्यादी रामेश्वर अचितराव आंधळे, पोहेकॉ यांच्या फिर्यादीवरुन अप नं.८७/२०२५ भान्यासं कलम २८१, १०३(१), १०९(१), सहकलम मोटार वाहन कायदा, कलम १८४, सहकलम महाराष्ट्र दारुबंदी कायदा, कलम ६५ (अ) (इ) अन्वये आरोपी संजय उत्तम शिवनकर, जि. बुलढाणा याचेविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. चौकशीदरम्यान आरोपीविरुध्द सबळ पुरावा गोळा करुन वि. न्यायालयात दोषारोप पत्र दिनांक १६.०५.२०२५ अन्वये दाखल करण्यात आले आहे.

(३) चौकशीदरम्यान नमुद आरोपीचे विरुध्द सबळ पुरावा गोळा करुन वि. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच पोलिस शिपायाचे कुटुंबियांना पुढील प्रमाणे आर्थिक मदत केली जात आहे :-

| अ. क्र. | रकमेचे विवरण | रक्कम | अदा / बाकी | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | पो.क.निधी मधुन अंत्यविधी अनुदान | २०,०००/- | अदा | २४.०३.२५ |
| २ | गटविमा योजना | ३,६०,०००/- | अदा | २३.०५.२५ |
| ३ | बचतनिधी योजना | ४१,९२२/- | अदा | २३.०५.२५ |
| ४ | अर्जित रजा रोखीकरण | ४,४६,७९१/- | | कोषागारात देयक दाखल |
| ५ | सानुग्रह अनुदान मा | ५०,०००/- | | पोमसं प्रस्ताव सादर |
| ६ | अपघात विमा | १०,००,०००/- | | कागदपत्रे अपुर्ण |
| ७ | अंतिम उपदान | ३,१७,१००/- | | महालेखाकार नागपूर, प्रलंबित |
| ८ | कुटुंब निवृत्तीवेतन दरमहा नियमित | २२,६५०/- | | महालेखाकार नागपूर, प्रलंबित |
| ९ | राष्ट्रीय निवृत्ती योजना | ८,४०,०००/- | | कोषागारात देयक दाखल |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी वसतिगृहांमध्ये विद्यार्थी संख्या वाढविण्याबाबत

**(३५) ८८२६ (२१-०७-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात एकूण किती आदिवासी वसतीगृहे व किती विद्यार्थी आहेत व या वसतिगृहांमध्ये एकूण किती क्षमतेपर्यंत विद्यार्थ्यांना निवासाची सुविधा उपलब्ध आहे, हे खरे हे काय,

(२) असल्यास, मागील ५ वर्षांत वसतीगृहातील क्षमतेत आणि विद्यार्थ्यांच्या संख्येत किती प्रमाणात वाढ झाली त्याकरिता नवीन वसतीगृहे उभारण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी वसतिगृहांमध्ये विद्यार्थी संख्या वाढविण्याबाबत तसेच या वसतीगृहांमध्ये दर्जेदार शिक्षण, आरोग्य आणि पोषण व्यवस्था उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (२३-०१-२०२६) :** (१) गडचिरोली जिल्ह्यात एकूण ३३ आदिवासी शासकीय वसतीगृहे असून एकुण मंजूर क्षमता ३२८० विद्यार्थी इतकी आहे.

(२) गडचिरोली जिल्हाअंतर्गत येणाऱ्या वसतीगृहाची एकूण विद्यार्थी मंजूर क्षमता ३२८० एवढी आहे. शैक्षणिक सत्र २०२५-२६ करिता सद्यस्थितीत प्रवेशित विद्यार्थी संख्या २७२२ इतकी आहे. गेल्या ५ वर्षातील आकडेवारीनुसार, विद्यार्थी क्षमतेपेक्षा कमी प्रमाणात विद्यार्थी वसतीगृहांमध्ये प्रवेशित असल्याचे दिसून यते.

(३) आदिवासी वसतीगृहांमध्ये विद्यार्थी संख्या वाढविण्याकरीता २५० विद्यार्थी क्षमतेपर्यंतच्या वसतीगृहांमध्ये विद्यार्थी क्षमतावाढ करण्याचे अधिकार आयुक्त, आदिवासी विकास यांना देण्यात आले आहेत. तसेच शासकीय आदिवासी वसतीगृहांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांचा आहार भत्ता, शैक्षणिक साहित्यभत्ता व निर्वाहभत्ता यामध्ये दिनांक ०४.०७.२०२५ च्या शासन निर्णयामध्ये भरीव वाढ करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्यांचे पालक व विद्यार्थी यांचा समावेश असलेली जनजाति छात्रावास समिती स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य नाट्य स्पर्धेसाठी सादरीकरण खर्च व दैनंदिन भत्ता यांच्या रकमेत वाढ करण्याबाबत

**(३६) ८८४० (०९-१०-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या माध्यमातून आयोजित होणाऱ्या हौशी मराठी, हिंदी, बालनाट्य, संस्कृत, संगीत, व्यावसायिक नाट्य स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संस्थांना देण्यात येणाऱ्या सादरीकरण खर्च व दैनंदिन भत्ता यांच्या रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव संचालक, सांस्कृतिक कार्य यांनी शासनाला सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्ताव वित्त विभागाकडे मान्यतेसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर स्पर्धेसाठी सादरीकरण खर्च व दैनंदिन भत्ता यांच्या रकमेत वाढ करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२४-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे. राज्य नाट्य स्पर्धेच्या नियमावलीत आवश्यकतेनुसार त्या-त्या वेळी बदल करण्यात येतात. विभागाच्या दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये हौशी मराठी नाट्य स्पर्धा व बाल नाट्य स्पर्धा, प्राथमिक फेरी; हौशी हिंदी, संस्कृत, संगीत, बाल नाट्य व दिव्यंग बाल नाट्य स्पर्धा, अंतिम फेरी या स्पर्धांच्या पारितोषिक रकमांमध्ये वाढ व सादरीकरण खर्चात वाढ तसेच, मराठी व्यावसायिक नाट्य स्पर्धा सादरीकरण खर्च वाढ आणि स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कलाकारांकरीता दैनिक भत्ता यामध्ये वाढ करण्यात आलेली आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) विभागाच्या दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्य नाट्य स्पर्धेतील सादरीकरण खर्च, दैनिक भत्ता आणि पारितोषिक रकमेत वाढ करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यात विविध प्रलंबित प्रकरणांबाबत

**(३७) ८८५१ (०८-०९-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात वनाधिकार कायद्यांतर्गत वैयक्तिक व सामूहिक वनपट्टे मंजूर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी किती पट्ट्यांचे नियमितीकरण झाले तसेच सातबाऱ्यावर नोंद झाली आहे,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित प्रलंबित प्रकरणांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०५-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) गडचिरोली जिल्ह्यात अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ सुधारणा नियम २०१२ अंतर्गत ३३२२९ वैयक्तिक वनहक्क दावे व १४४२ सामुहिक वनहक्क दावे मंजूर करण्यात आले आहेत. यापैकी वैयक्तिक व सामुहिक असे एकूण ३४६७१ वनहक्क पट्ट्यांचे नियमितीकरण झाले आहे.
(३) वनहक्क कायद्यांतर्गत मंजूर केलेले नवीन वनपट्टे तसेच वनपट्ट्यांची भूमि अभिलेखाकडून मोजणी, 'क' शिट प्रमाणे सर्वे क्र. मध्ये तफावत, क्षेत्र तफावत, नावात बदल किंवा गावात बदल इत्यादी कारणांमुळे ७/१२ व शेड्युल जे-१ तयार होण्यास प्रलंबित असलेल्या वनपट्ट्यांमध्ये संबधित तहसिल कार्यालयाकडून दुरुस्तीचे प्रस्ताव मागविण्यात येतात व जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडून पुन्हा वनपट्ट्यामध्ये दुरुस्ती करून प्रलंबित राहिलेली प्रकरणे निकाली काढण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिमेंट व सिमेंटवर आधारीत उद्योभामधील कामगारांचे किमान वेतन दर पुनर्निधारीत करणेबाबत

**(३८) ८८५६ (१९-०९-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या कलम ३ मधील तरतुदीनुसार किमान वेतनावर ५ वर्षानंतर किंवा मुल्य निर्देशांक ५० अंकानी वाढल्यास पुनर्निधारीत केले जातात परंतु सिमेंट व सिमेंटवर आधारीत उद्योग या अनुसूचित असलेल्या उद्योगातील कामगारांचे किमान वेतन निर्धारित होऊन १७ वर्षाचा कालावधी झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिमेंट व सिमेंटवर आधारित उद्योगातील कामगारांचे किमान वेतन दर नव्याने पुनर्निधारित करण्याची मागणी कामगार संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०८-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) किमान वेतन अधिनियम, १९४८ या अधिनियमाच्या अनुसूची-एक मधील नमूद "सिमेंट व सिमेंटवर आधारीत उद्योग" या अनुसूचित उद्योगातील दोन्ही उद्योग वेगळे करुन सिमेंट उत्पादन करणाऱ्या उद्योगातील कामगारांचे किमान वेतन ठरविण्याबाबत कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या अभ्यासगटास त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यास कळविण्यात आले आहे. त्यान्वये प्रस्तुत प्रकरणाबाबत अभ्यासगटामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गलगत खोपोली शहरात शासकीय विश्रामगृह बंद अवस्थेत असल्याने तेथे गैरप्रकार सुरु असल्याबाबत

**(३९) ८८७१ (१८-०८-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गालगत खोपोली शहरात मोक्याच्या ठिकाणी असलेल्या अडीच एकर जागेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असलेले शासकीय विश्रामगृह बंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विश्रामगृह हे बंद अवस्थेत असल्याने इमारतीची दुरवस्था झाली असून अंधाराचा फायदा घेत दारु पिणाऱ्याचा अड्‌डा बनला असून अनेक गैरप्रकार सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विश्रामगृहाची संरक्षण भिंत ढासळलेली असून विश्रामगृहाचे प्रवेशद्वार मोठमोठी दगड लावून आधारावर उभे असून, विश्राम गृहाचा परिसर पूर्णपणे पालापाचोळा आणि कचऱ्याने भरला असून या ठिकाणी खानसामा, सुरक्षारक्षक नसल्याने रात्रीच्या वेळेस इमारतीचा गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदरहू शासकीय विश्रामगृहाचे काम लवकरात लवकर दुरुस्ती करून येथील गैरप्रकार थांबविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०१-१२-२०२५) :** (१) होय.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

विश्रामगृह बऱ्याच वर्षापासून बंद असल्यामुळे संरक्षक भिंत तुटलेल्या अवस्थेत आहे. विश्रामगृहासाठी कोणताही खानसामा, सुरक्षारक्षक किंवा अन्य कर्मचारी नसल्यामुळे परिसरात पालापाचोळा जमा झाला आहे. तथापि तेथे गैरप्रकार सुरु असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) मोडकळीस आलेल्या संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्याकरिता प्रस्ताव व अंदाजपत्रक जिल्हा नियोजन कार्यालय, अलिबाग, रायगड या कार्यालयाकडे प्रशासकीय मंजूरीकरिता पाठविण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी कोणताही गैरप्रकार होऊ नये म्हणून पोलिस प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांचे समवेत स्थळ पाहणी करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी अनुचित प्रकार टाळण्याकरिता उपाय योजना करण्याच्या अनुषंगाने पोलिस विभागामार्फत खोपोली शहर हद्दीमध्ये सुरक्षेच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या नित्य तपासणी फेरी दरम्यान खोपोली विश्रामगृह परिसरामध्ये पोलिस कर्मचाऱ्यांमार्फत खोपोली विश्रामगृह परिसराची दक्षपूर्वक तपासणी करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खालापूर यांच्याकडून पोलिस प्रशासनास विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल स्थापन करण्याबाबत

**(४०) ८८९७ (०७-०८-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि पर्यटकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल (पर्यटन मित्र) स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दलाचा (पर्यटन मित्र) स्थापन करण्याचा मुख्य उद्देश कोणता आहे,
(३) असल्यास, राज्यात येणाऱ्या पर्यटकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, तसेच राज्यातील संस्कृती, इतिहास, पर्यटनस्थळे, कायदा, नियम, पर्यटनाविषयी आवश्यक माहिती देण्यासाठी राज्यातील पर्यटन स्थळांवर सुरक्षिततेसाठी जवान अथवा पोलिसांची नियुक्ती करण्याकरिता राज्यसुरक्षा मंडळाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, या जवानांना अथवा पोलिसांना पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक प्रशिक्षण, वाहन व्यवस्था व अन्य सुविधा पुरविल्या जाणार आहेत काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (०४-०२-२०२६) :** (१) व (२) हे, खरे आहे.

महाराष्ट्र राज्यातील पर्यटनस्थळी भेट देणाऱ्या पर्यटकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे आणि राज्यातील संस्कृती, इतिहास, रीतीरिवाज, पर्यटनस्थळे इ. बाबतची माहिती पर्यटकांना देण्यासाठी दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या विभागाच्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र पर्यटन धोरण २०२४ अंतर्गत "महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल" निर्माण करण्यात आले आहे.
(३), (४), (५) व (६) हे खरे आहे.

महाबळेश्वर महोत्सवाकरिता नियोजन आणि पर्यटक सुरक्षा याकरीता प्रायोगिक तत्वावर सातारा जिल्ह्यामध्ये "महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा दल" नियुक्त करण्यात आले असून त्यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडील एकूण २५ जवानांची नेमणूक करण्यात आली होती. तसेच, महोत्सवाचे नियोजन आणि पर्यटकांची सुरक्षितता याकरीता सुरक्षा दलास आवश्यक ते प्रशिक्षण, वाहन व्यवस्था जिल्हा पोलीस अधिक्षक, सातारा यांच्यामार्फत करण्यात आली होती.

---

## विदर्भ, मराठवाडा या भागात होत असलेल्या नवीन आर्थिक गुंतवणूकीबाबत

**(४१) ८९३३ (१९-०९-२०२५). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दावोस येथे आर्थिक गुंतवणूक परिषदेत १९ प्रकल्पांना मंत्रिमंडळ बैठकीमध्ये माहे मार्च, २०२५ मध्ये मान्यता देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुंतवणुकी संदर्भातील १९ प्रकल्प हे विदर्भ व मराठवाडयातील असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त १९ प्रकल्पांमध्ये ऑरिक सिटी (छत्रपती संभाजीनगर) यासह मराठवाडा व विदर्भामध्ये जिल्हानिहाय कोणते व किती प्रकल्प राबविण्यात येणार आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात किती रोजगार निर्मिती होणार आहे व त्यासाठी किती कोटींच्या निधीची गुंतवणूक करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१९-१२-२०२५) :** (१), (२) व (३) होय अंशत: खरे आहे.

जागतिक आर्थिक परिषद-२०२५ मध्ये सुमारे ६३ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. त्यापैकी मा.मंत्रीमंडळ उपसमितीच्या दिनांक २५.०३.२०२५ रोजी आयोजित ११ व्या बैठकीमध्ये एकूण २१ प्रस्ताव उपसमितीच्या विचारार्थ सादर करण्यात आले होते. त्यापैकी २ धोरणात्मक बाबीचे प्रस्ताव वगळता उर्वरीत १९ उद्योग घटकांच्या प्रकल्पांना समितीने विशेष प्रोत्साहने मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर १९ प्रकल्पांव्दारे राज्यात आगामी कालावधीत रु.३,९२,०५६ कोटी एवढी गुंतवणूक व १,०५,२२५ एवढी रोजगार निर्मिती होणार आहे. त्यापैकी विदर्भात एकूण ११ प्रकल्प स्थापित होणार असून त्याव्दारे सुमारे २,९०,९०० कोटी गुंतवणूक व सुमारे ५४,४८५ इतका रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.

मराठवाडयात २ प्रकल्प स्थापित होणार असून त्याव्दारे सुमारे १४,५२१ कोटी गुंतवणूक व ८००० रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.

सदर उद्योजक कंपन्यांमध्ये सोलर पीव्ही मॉड्युल, सेमीकंडक्टर, वेफर्स, अवकाश व संरक्षण साहित्य, लिथियम आयन बॅटरी, केमिकल व पॉलिमर्स या क्षेत्रातील उद्योगांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षकांकडून मागविण्यात येणारी प्रशासकीय माहितीबाबत

**(४२) ८९८६ (०८-०९-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाळांचे मुख्य कार्य अध्ययन व अध्यापन असूनही विविध योजनांतर्गत शिक्षकांकडून शासनाला माहिती संकलित करून देण्याचे कार्य नियमित स्वरूपात करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण विभागाकडून सातत्याने विविध प्रकारची माहिती मुख्याध्यापक व शिक्षकांकडून मागविण्यात येत असून आधार कार्ड नोंदणी व अपार आयडी तयार करणे इत्यादी कामांमुळे गुणवत्ताधारित अध्यापन करणारे शिक्षक प्रशासनिक कामांत गुंतत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांकडून विविध माहिती मागविण्याऐवजी शासनाने ऑनलाईन प्रणालीद्वारे थेट माहिती प्राप्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२९-०१-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) अपार आयडी हा एक विद्यार्थ्याला दिला जाणारा विशिष्ट क्रमांक असून त्यामुळे विद्यार्थ्यांच्या त्यांच्या संपूर्ण शैक्षणिक वर्षातील कार्य व प्रगती यांचे मुल्यांकन नोंद करण्याची सुविधा आहे. या आयडीखाली विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगारी, गुणपत्रिका, उपस्थिती, होमवर्क व प्रकल्प कार्य, शिस्त तसेच सहशालेय उपक्रमातील सहभाग यांची माहिती व्यवस्थितरित्या नोंद केली जाते. या अपार आयडीबाबत सनियंत्रणाचे काम शिक्षकांना करावे लागते. तसेच आधारकार्ड काढण्याचे काम पालकांचे असून शिक्षकांना केवळ माहिती संकलित करावी लागते. शिक्षण विभागास धोरण आखणे व योजना आखणे याकरीता ही माहिती उपयुक्त ठरते. तसेच शाळा स्तरावर शिक्षकांच्या सोईसाठी शासनाने विविध प्रकारच्या पोर्टलची निर्मिती केली असून विविध प्रकारची माहिती एकाच ठिकाणी माहिती उपलब्ध होऊन कामे कमी झाली असून अधिकृत माहिती उपलब्ध होत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत १३४ इमारती अतिधोकादायक अवस्थेत असल्याबाबत

**(४३) ९०३२ (०८-०९-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळ्याच्या तोंडावर अतिधोकादायक इमारतींची यादी तयार केली असून मुंबईत एकूण १३४ अतिधोकादायक खासगी इमारती असून यामध्ये पश्चिम उपनगरात सर्वाधिक इमारती आहे. तसेच गोरेगाव आणि (वांद्रे) पश्चिम परिसरात सर्वाधिक धोकादायक इमारती असल्याने गेल्या काही वर्षांपासून मुंबई महानगरपालिकेने केलेल्या कारवाईमुळे मुंबईतील खासगी धोकादायक इमारतींची संख्या कमी होऊ लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अतिधोकादायक इमारती कोसळून जीवित हानीचा संभाव्य धोका लक्षात घेता इमारतींमधील रहिवाशांची सुरक्षितता व इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी महानगरपालिका प्रशासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

मुंबई महानगरपालिकेने विभाग स्तरावर केलेल्या कारवाईमुळे मुंबईतील खाजगी भूखंडावरील धोकादायक इमारतींची संख्या कमी होत आहे

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. ११३५/२०१४ मधील आदेशानुसार व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार सी-१ प्रवर्गात समाविष्ट इमारतींचे वीज, पाणी व गॅस पुरवठा खंडीत करणे, सदर इमारती रिक्त करणे व त्यांचे निष्कासन करण्याची कारवाई नियमितपणे सुरू असते.

अतिधोकादायक इमारती कोसळून होणारी संभाव्य जीवित हानी टाळण्याकरिता महानगरपालिकेकडून दरवर्षी अशा इमारतींची यादी महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येते. तसेच अशा इमारतींमध्ये वास्तव्य करणे धोक्याचे असल्यामुळे घ्यावयाची खबरदारी व आवश्यक उपाययोजना कशा कराव्यात याबाबत स्थानिक वृत्तपत्रांमधून जाहिरात प्रसिद्ध करण्यात येते. तसेच अशा इमारतींच्या दर्शनी भागावर धोकादायक इमारती

कोसळून होणाऱ्या संभाव्य दुर्घटना टाळण्याकरिता जागरूकता निर्माण करण्याकरिता भित्तीपत्रके चिकटविण्यात येतात. याशिवाय महापालिकेचे संबंधित अधिकारी धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्यात असलेल्या नागरिकांना वेळोवेळी प्रत्यक्ष भेट देऊन सुचित करत असतात. मुंबई मनपा १८८८ मधील कलम ३५४ अंतर्गत धोकादायक इमारत रिक्त करून त्वरित निष्कासन करण्याकरिता संबंधित इमारतींचे मालक / भाडेकरू /भोगवटादार / ताबेदार व सदर इमारत सहकारी गृहनिर्माण संस्था असल्यास सदर संस्थेचे अध्यक्ष / सचिव आणि सदस्य यांच्या विरूद्ध नोटीस बजावून इमारतींचे वीज, पाणी व गॅस पुरवठा खंडीत करणे, सदर इमारती रिक्त करणे व त्यांचे निष्कासन करण्याची कारवाई महानगरपालिकेच्या स्तरावरुन करण्यात येते.

---

**संजय गांधी निराधार योजनेची उत्पन्न मर्यादा व वयोमर्यादा**
**लाडकी बहीण योजनेप्रमाणे करण्याबाबत**

**(४४) ९०६२ (१८-०८-२०२५). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेच्या पात्रतेसाठी शासनाने २.५ लाख कुटुंब उत्पन्न मर्यादा ठेवलेली असताना संजय गांधी निराधार योजनामध्ये वार्षिक उत्पन्न मर्यादा १८०००/- रुपये ठेवण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन योजनेच्या वार्षिक उत्पन्न मर्यादेत तसेच पात्रतेसाठी असलेल्या वयोमर्यादेतही तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संजय गांधी निराधार योजनेची उत्पन्न मर्यादा व वयोमर्यादा लाडकी बहीण योजनेप्रमाणे करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (१०-११-२०२५) :** (१) हे खरे नाही. संजय गांधी निराधार अनुदान योजनेचा लाभ मिळवण्यासाठी कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २१,०००/- आहे.

(२), (३) व (४) मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेत राज्यातील २१ ते ६५ या वर्ष वयोगटातील विवाहीत, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटूंबातील केवळ एक अविवाहीत महिलेला लाभ देण्यात येतो. सदर योजनेअंतर्गत लाभार्थी महिलेच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापेक्षा जास्त नसावे.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेमध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे अथवा रुपये २१,०००/- पर्यंत कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असलेल्या १८ ते ६५ वयोमर्यादा असलेल्या पात्र लाभार्थ्यांना रुपये १५००/- दरमहा इतके अर्थसहाय्य दिले जात आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या दोन्ही स्वतंत्र योजना असल्याने संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या निकषात बदल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे उपकेंद्र चंद्रपूर येथे स्थापन करण्याबाबत**

**(४५) ९०६३ (०८-०९-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली उपकेंद्र चंद्रपूर येथे स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रू.४१४.७४ कोटींच्या प्रस्तावास त्वरीत मान्यता देण्यात येईल, असे आश्वासन मा. उच्च शिक्षणमंत्री यांनी दिनांक १८ मार्च, २०२५ रोजी विधानसभेत दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावास मान्यता देऊन उपकेंद्र स्थापनेसाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२७-११-२०२५) :** (१) होय.
(२) होय.
(३) राज्य सार्वजनिक विद्यापीठांमध्ये उपकेंद्र स्थापन करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. उपरोक्त वस्तुस्थिती संबंधीत लोकप्रतिनिधी यांना दिनांक १२.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरखेड (जि.नागपूर) तालुक्यात ३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्र मंजूर करण्याबाबत

**(४६) ९१६५ (०७-०८-२०२५). श्री.किसन वानखेडे (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील उमरखेड स्थित महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) क्षेत्रातील मौजा कुपटी (मर्सेल) येथे प्रत्येकी स्वतंत्र दर्जाचे ३३ केव्ही विद्युत उपकेंद्र उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच मौजे तिवडी फाटा ३३ के.व्ही. उपकेंद्र येथे अतिरिक्त ५ एमव्हीए रोहित्र देणेबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी अध्यक्ष तथा व्यवस्थापकिय संचालक, महावितरण कंपनी मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई यांना अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी अहवाल सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, या अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे आहे,

मौजा कूपटी (मर्सेल) येथे विद्युत प्रणालीचे सुधारीत वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) ३३/११ के.व्ही. विद्युत उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. संबंधित कामांना केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सदरची कामे करण्यात येणार आहेत.

तसेच, मौजे तिवडी फाटा ३३ के. व्ही. उपकेंद्र येथे अतिरिक्त ५ एम.व्ही.ए. रोहित्र मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० (MSKVY-२.०) या योजनेअंतर्गत काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इसापूर डाव्या कालव्याच्या मायनरला भूसंपादन व टेलिंगची कामे करुन शेतीचे नुकसान टाळण्याबाबत**

**(४७) ९१७६ (१९-०८-२०२५). श्री.किसन वानखेडे (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इसापूर डाव्या कालव्याच्या मायनरला (छोटा कालवा) भूसंपादन व टेलिंगची (टेलिकम्युनिकेशन) कामे करुन शेतीचे नुकसान टाळण्यासाठी जलसंपदा विभागानी दिनांक ६ मे, २०२५ रोजी कार्यकारी संचालक, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना कार्यवाही करुन अहवाल तात्काळ सादर करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात अहवाल सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, या अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१८-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. सदर आदेशाच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर सर्वेक्षण करण्याची कार्यवाही चालू आहे. तद्नंतर प्रस्ताव प्राप्त होताच पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माजलगाव (जि.बीड) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळात विद्युत पुरवठा खंडीत होत असल्याबाबत**

**(४८) ९१८९ (०७-०८-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळात सतत विद्युत पुरवठा खंडीत होत असल्याबाबत ॲग्रोसिन प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी महावितरण उपविभाग, माजलगाव, जि.बीड यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) माजलगाव जि. बीड येथील औद्योगिक विकास महामंडळाअंतर्गत येणाऱ्या वीज ग्राहकांना ३३/११ केव्ही केसापुरी उपकेंद्रातून येणा-या ११ केव्ही MIDC New फिडरद्वारे वीजपुरवठा करण्यात येतो.

सदर ३३ केव्ही केसापुरी वीज वाहिनी ४० कि.मी. लांबीची असून, दुर्गम भागातून व गोदावरी नदीच्या काठावरुन अति गर्द झाडाझुडपातून गेलेली आहे. या ३३ केव्ही केसापुरी वीज वाहिनी लगत असणाऱ्या झाडाच्या फांदया वीज वाहिनीवर पडल्याने वीज वाहिनीमध्ये बिघाड होऊन माजलगाव जि. बीड येथील औद्योगिक विकास महामंडळ येथील वीज ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. महावितरण कंपनीचे कर्मचारी व सुचिबध्द कंत्राटदाराकडून देखभाल व दुरुस्तीची कामे करुन ३३ केव्ही केसापुरी वीज वाहिनीवरील वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला होता.

३३ केव्ही केसापुरी वीज वाहिनीवर माहे सप्टेंबर, २०२४ पासून २४ जागी वीज वाहिनीचे डिस्क ईन्सुलेटर बदलणे, २० गाळयाचे तारा ओढणे, २० पिन ईन्सुलेटर बदलणे, यीज वाहिनीवर ११ नवीन पोल उभे करणे तसेच वीज वाहिनी जवळील झाडांच्या फांद्या तोडणे अशी कामे करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे ११ केव्ही MIDC New योज वाहिनी जवळील झाडांच्या फांद्या तोडणे व वीज वाहिनीच्या १८ गाळ्यातील तारा ओढण्याचे काम करण्यात आले आहे.

३३ केव्ही केसापुरी वाहिनीवरील वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी ३३/११ केव्ही सादोळा उपकेंद्र येथे ऑऊट गोइंग ब्रेकर दिनांक १५.०८.२०२५ पासून कार्यान्वित करण्यात आला आहे. तसेच दुसरा ऑऊट गोइंग ब्रेकर ३३/११ केव्ही केसापुरी उपकेंद्र येथे बसविण्यात येणार आहे. यामुळे ग्राहकांना योग्य दाबाने व सुरळीत वीजपुरवठा करणे शक्य होणार आहे.

माजलगाव जि. बीड परिसरात वीजपुरवठा अखंडित सुरु ठेवण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत NSC योजनेअंतर्गत ३३/११ केव्ही MIDC उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच महापारेषण कंपनीतर्फे २२० केव्ही माजलगाव MIDC उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मृद व जलसंधारण विभागास कर्मचारीवृंद उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४९) ९२८२ (१९-०९-२०२५). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.रविशेठ पाटील (पेण), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलयुक्त शिवार योजना राबविल्यानंतर सन २०१७ मध्ये कृषी विभागातून मृद व जलसंधारण हा वेगळा विभाग तयार करण्यात येवून कृषी विभागाचे नऊ हजार अधिकारी, कर्मचारी जलसंधारण विभागास देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली होती, मात्र अद्यापपर्यंत सदर निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाची कर्मचारी संख्या सुमारे २७ हजार ५६० इतकी असून, यातील १९ पदे कार्यरत आहेत तर अंदाजे ३० टक्के पदे अनेक कारणांनी रिक्त असून, त्यातील ९ हजार पदे जलसंधारण विभागांकडे देण्यात आली तर कृषी विभाग अडचणीत येणार असल्याकारणाने सदरहू पदे जलसंधारण विभागास देण्यास विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मृद व जलसंधारण विभागाकडे कामांचा ओघ असून, आगामी काळात "जलयुक्त शिवार अभियान ३.०" राबविण्यात येणार असून त्याकरीता कृषी विभागाकडून नऊ हजार कर्मचारी उपलब्ध होत नसल्याने अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषी विभागाकडून मनुष्यबळ मिळणे अपेक्षित असताना कृषी विभागाने मनुष्यबळ देण्यास नकार दिल्यामुळे गत सात वर्षांपासून मृद व जलसंधारण विभागाला अपेक्षित मनुष्यबळ मिळालेले नसल्याने विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी संथ गतीने सुरू असल्याचे व त्या राबवताना अडचणी निर्माण होत असल्याचे दिनांक ८ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी कृषी विभागाचे कर्मचारी मिळणार नसतील तर नव्याने आकृतीबंध मंजूर करुन नोकर भरती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१०-१२-२०२५) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) दिनांक ३१.०५.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मृद व जलसंधारण विभागांतर्गत आयुक्तालयाच्या स्थापनेसह क्षेत्रीय यंत्रणेचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला. त्यानुसार कृषी विभागाकडून मृद व जलसंधारण विभागाकडे ९९६७ पदे वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. कृषि विभागाकडून दिनांक १२.०९.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये, एकूण २१८१ पदे या विभागास वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली, प्रत्यक्षात सदरची पदे वर्ग करण्यात आलेली नाहीत. यास्तव उच्चस्तरीय सचिव समितीपुढे या विभागाचा स्वतंत्र आकृतीबंधाचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता त्यास मान्यता मिळाली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**पंचायत समिती (बीड) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत संबंधित दोषी कंत्राटी कर्मचाऱ्यांची अन्यत्र ठिकाणी बदली करण्याबाबत**

**(५०) ९२८८ (०८-०९-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती (बीड) येथे मागील तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कंत्राटी कर्मचारी कार्यरत असल्याने मोठ्या प्रमाणावर त्यांचे प्रत्यक्ष लाभार्थी व ग्रामपंचायतीचे हितसंबंध वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी सन २०२४-२५ या कालावधीमध्ये जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद व वरिष्ठ कार्यालयाकडे यासंदर्भात चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच संबंधित दोषी कंत्राटी कर्मचाऱ्यांची अन्यत्र ठिकाणी बदली करण्यात यावी, अशी मागणीही तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (०२-१२-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) तक्रारी असलेल्या व क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त झालेले बदलीचे प्रस्ताव शासन स्तरावर कार्यवाहीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.